
MAHMARI 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

# व्ही. पी. एम्. दिशा



वर्ष चौदावे / अंक ८ / ऑगस्ट २०१३

## संपादकीय

### व्यसनाधीनतेचे चक्रव्यूह

दर्यावर्दी कोलंबस व त्याचे खलाशी इ.स. १४९२ मध्ये कॅरेबिअन बेटांवर उतरले. तेथे त्यांना तंबाखू वापरणारी माणसे आढळली. ही माणसे विस्तवावर तंबाखूची पाने टाकून त्यांचा धूर एका नळीतून नाकाने ओढत होती. या नळीला 'टाबाको' हा शब्द होता. यावरूनच पुढे टोबॅको हे नाव पडले. याचा अर्थ, यापूर्वी हे व्यसन नव्हते असे नाही. जगभरच विविध स्वरुपांमध्ये तंबाखूचे सेवन या सवयीला मोठा इतिहास आहे. तंबाखूमध्ये निकोटिन हे द्रव्य असते हे सर्वज्ञात आहे. यामुळे व इतर कैक विषारी पदार्थांमुळे तोंडाच्या आतील बाजूस गंभीर जखमा होतात. या जखमांमधून कर्करोगाची लागण होते. तंबाखू धुराच्या रूपात सेवन करणाऱ्यांच्या फुफ्फुसांना, पोटात लागण होऊन देखील कर्करोग होऊ शकतो.

दुर्दैवाने कर्करोग होण्याचे वय वेगाने खली येत आहे. अवघ्या अठरा वीस वर्षांच्या तरुणांमध्ये कर्करोगाचे प्रमाण वाढावे, याचा सरळ अर्थ या पिढीचे भवितव्य धोक्यात आहे. याला प्रामुख्याने पालक जबाबदार असतात. तसेच शासनही असते हे लक्षात घ्यायला हवे. न्यायालयाचा धाक वाटण्याचे प्रमाण कमी होत आहे; म्हणून या गोष्टी आज समाजात अपरिहार्य बनल्या आहेत. त्या उपलब्ध करुन देणारी यंत्रणा अत्यंत प्रभावी आहे. पावलोपावली आज या गोष्टी अशा काही उपलब्ध आहेत, की जणू अत्यावश्यक सेवाच उपलब्ध असाव्यात! शिवाय त्या अत्यंत स्वस्त असतात. विद्यार्थ्यांचे आदर्श (?) असणारे नट, खेळाडू करत असलेल्या या उत्पादनांच्या जाहिराती हेही विद्यार्थ्यांचे आकर्षण ठरते.

हे सर्व आपणांस माहीत आहे तरी या संबंधात ही पार्श्वभूमी देण्याचे कारण गुटखाबंदी हा चावून चोथा होऊ घातलेला विषय याबाबत आपले शिक्षणही तोकडे पडते. अंतर्मुख होऊन विचार करायला लावत नाही. संस्कार करत नाही ते शिक्षण कसे असेल? म्हणूनच, बंदी असतानाही गुटखा सहज उपलब्ध असतो. बंदीच्या निर्णयाचे हे

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय**)

अपयश आहे. दुर्दैवाने महसुलाचे कारण देत दारुबंदी हा निर्णय जसा हास्यास्पद केला आहे, तसाच गुटखा बंदीचा निर्णय हास्यापद होत आहे. ज्यांच्या मनात समाजाचे हित करण्याची इच्छा असणे अपेक्षित असते ते लोक प्रतिनिधी कणा नसलेले आहेत. न्याय व्यवस्थेचा वचक नाही. लोकानुयय करत पुढच्या पाच वर्षांच्या स्वप्नांची लाचारी करणारे सत्तालोलुप नेते, मंत्री हे काय करतात? पूर्वीचे शाळेतील मास्तर विद्यार्थ्यांना जशी कळकळीने शिस्त लावत तशी शिस्त या शासन कर्त्यांनी लावायला नको का? केवळ लोकशाहीचे कारण पुढे करायचे, गंभीर प्रश्नांवरून समाजाचे लक्ष विचलित करायचे व दारू, बार, सिगारेट, गुटखा, तंबाखू हे वा तत्सम विषय केवळ चघळत ठेवायचे असे राजकारणी करायचे आहेत काय? सर्व काही सेवा भावी संघटनांनी आणि लोकांनी करायचे असेल तर या सरकारने राजीनामे देऊन परागंदा व्हावे. गुटखा बंदी म्हणजे गुटखा बंदी; एक ही पाकीट राज्यात कोठेही आढळणार नाही याची दक्षता घेण्याची जबाबदारी या तथाकथित लोक प्रतिनिधींची आहे.

जागतिक आरोग्य संघटनेने दिलेल्या एका अहवालानुसार भारतात तोंडाच्या कर्क रोगाचे सत्तर हजार तर अमेरिकेत तेवीस हजार रुग्ण २००८ साली आढळले. भारतात हे प्रमाण खूपच जास्त आहे. तंबाखू व चुना, सुपारी तोंडात ठेवणे व अनेक वर्षे हे व्यसन करणे यामुळे भारतात कर्करोगाचे प्रमाण जास्त आहे. आरोग्य संघटनेच्या सदर अहवालात म्हटल्यानुसार भारतामध्ये प्रतिवर्षी ७५ ते ८० हजार रुग्ण नव्याने आढळतात.

अशा अनेक संघटनांच्या अनेक अभ्यासामधील गंभीर निष्कर्ष माध्यमांमधून पुढे येतच असतात. संशोधकांचे अविरत संशोधन चालते. कर्क रोगाच्या इस्पितळांतून असणारी खाटांची सोय अपुरी आहे, म्हणून रुग्ण व त्याचे नातेवाईक इस्पितळांच्या जिन्यात, समोरील बागेत, रस्त्यांवर कसेबसे राहतात कारण उपचारांसाठी ते दूर दूरहून आलेले असतात. रुग्णाच्या वाचण्याची सुतराम शक्यता नसते; पण 'आपलं माणूस' आणि 'आशा' या कठीण स्थितीतून ही माणसे भोग भोगत असतात. हे सर्व पाहिले तर कोणत्याही संवेदनाशील मनाला वेदना होतील. डोळ्यांत पाणी येईल...पण राज्यकर्ते या दुःखासाठी काही न करता षंढासारखे मिरवत असतात. त्यांना काही सद्बुद्धी झाली तर तो सुदिन म्हणावयाचा! नाही तर गुटख्याच्या पुडीमध्ये कोंडलेले जनतेचे शाप त्यांना भोगावे लागतील.

तरुणांमधील व्यसनाधीनता रोखण्याच्या दृष्टीने गुटखा तंबाखू तर बंद व्हायला हवाच, पण अनेक संसार उद्ध्वस्त करणाऱ्या दारुचे महापूरही थांबायला हवेत. त्यासाठी कार्यक्षम व पुरेसे कर्मचारी असणारी यंत्रणा कार्यरत व्हायला हवी. व्यसनांच्या महापुरात गटांगळ्या खाणारे रस्तोरस्ती थुंकून हवा 'जंतूमय' करणारे तारुण्य वाचवायचे असेल, तर नागरिक म्हणून अशी अपेक्षा करणे हेच आपल्या हातात आहे! दुसरे काय?

**– मोहन पाठक**

वर्ष चौदावे/अंक ८/ऑगस्ट २०१३

वर्ष चौदावे/अंक ८ /ऑगस्ट २०१३

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १८ वे/अंक २ रा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. मोहन पाठक | |
| २) | केंब्रिजच्या प्राणिशास्त्र संग्रहालयाला भेट | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | श्रीमत् भगवद् गीता - अध्याय सातवा<br>विषय : ज्ञान विज्ञान योग | कै. शं. बा. मठ | ६ |
| ४) | साहित्य-जगत | श्री. शरद जोशी | १० |
| ५) | श्री. विवेक कुलकर्णी यांना अनावृत पत्र | श्रीमती आशा भिडे | १५ |
| ६) | आर्य धर्माचा प्रसार - काल आणि आज | श्री. नरेन्द्र नाडकर्णी | १७ |
| ७) | कौटुंबिक कलह टाळता येऊ शकतो | प्रा. विनोद एच. वाघ | २३ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | २५ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ अभ्यासपूर्ण लेखांसाठी आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगी मूल्ये द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेची देणगी मूल्य पाठवावी.
- www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याच रु. २५०/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.

– संपादक

# केंब्रिजच्या प्राणिशास्त्र संग्रहालयाला भेट

*केंब्रिज मधील प्राणिशास्त्र संग्रहालयाची अतिशय सुंदर, उपयुक्त माहिती देणारा लेख – संपादक*

प्राच्य विद्या अभ्यास संस्थेच्या वतीने दरवर्षी विद्यार्थ्यांची इंग्लंडला शैक्षणिक सहल नेण्यात येते. या सहलीत या विद्यार्थ्यांचा केंब्रिज शहरात तीन दिवस मुक्काम असतो. केंब्रिजमधील शैक्षणिक संस्था, वाचनालये आणि संग्रहालय पाहणाचा भरगच्च कार्यक्रम असतो. या शहरात एक संग्रहालय संकुल आहे. तेथे वेगवेगळ्या विषयावरची संग्रहालये आहेत. विद्यापीठाच्या वेगवेगळ्या विभागाने त्यांच्या सोयीसाठी संग्रहालय उभारलेले आहे. अभ्यास आणि संशोधन यासाठी त्या त्या विभागातील विद्यार्थी आणि प्राध्यापक या संग्रहालयाचा उपयोग करतात. याखेरीज ही संग्रहालये सामान्य माणसासाठीं देखील खुली आहेत. प्रवेश विनामूल्य आहे आणि संग्रह चांगला आहे. त्यामुळे पर्यटक येथे गर्दी करतात. विज्ञान, इतिहास विभागाने चालविलेले विज्ञान इतिहास संग्रहालय आम्ही पाहिले. ते पाहून झाल्यावर आम्ही जवळच असलेल्या प्राणिशास्त्र संग्रहालयाकडे मोर्चा वळविला. मुख्य रस्त्यावरून हे संग्रहालय दिसतच नाही. एका लहानशा दारातून आत गेलो की पुढे प्राणिशास्त्र विभाग आणि त्यालाच जोडून असलेले प्राणिशास्त्र संग्रहालय आपल्या नजरेत पडते.



**संग्रहालयातील भव्य इमारत**

संग्रहालयात प्रवेश करण्यापूर्वीच आपले लक्ष वेधून घेते ते व्हेल माशाचा अवाढव्य सांगाडा. संग्रहालयाच्या दर्शनी भागात वरच्या मजल्यावर हा मासा ठेवलेला आहे. इंग्लंडच्या समुद्रकिनाऱ्यावर मासेमारी करताना कोळ्यांना हा मासा सापडला. ही बातमी जेव्हा केंब्रिजच्या शास्त्रज्ञांना कळली तेव्हा ते तिथे गेले आणि तो मासा घेऊन आले. त्यावर नंतर त्यांनी प्रक्रिया केली आणि संग्रहालयाच्या दर्शनी भागात दुरून दिसेल अशा पद्धतीने टांगून ठेवले. त्यासाठी संग्रहालयाचा त्यांना विस्तार करावा लागला. आतील वस्तू पाहण्याआधी आम्ही प्रथम हा मासा पाहण्याचे ठरविले. माशाजवळ उभे राहील्यावर त्याच्या तुलनेत आपण किती लहान आहोत याची कल्पना येते. माशाची लांबी असावी साधारणपणे १०० फूट तसेच रुंदी असावी साधारणपणे ४० फूट. त्याच्या शरीराचे अवयव अजूनही स्पष्टपणे दिसतात. त्याचे कल्ले, त्याचा जबडा, त्याची शेपटी या सर्व बाबी जशाच्या तशा आहेत. आमच्या सोबतच्या मुलांनी माशाच्या भोवताली फिरून त्याचे बारकाईने निरीक्षण केले. अनेकांना माशाला स्पर्श करण्याचा मोह आवरता आला नाही. साधारणपणे १५ मिनिटे आम्ही व्हेल माशाचेच निरीक्षण करीत होतो. त्यानंतर खाली उतरून आम्ही मुख्य संग्रहालयात प्रवेश केला.



**व्हेल माशाचा सांगाडा**

उंच उडी मारण्यासाठी चार पावले मागे जावेच लागते.

संग्रहालयाच्या प्रवेशद्वाराजवळच आपल्याला अनेक दुर्मीळ वस्तू आढळतात. यात चार्लस् डार्विनने गोळा केलेल्या वस्तूंचा संग्रह आहे. चार्लस् मूळचे केंब्रिजचे. बिगल जहाजावर त्यांची निवड झाली. हे जहाज जेथे जेथे गेले तेथील प्राण्यांचे त्यांनी निरीक्षण केले. काही नमुने त्यांनी सोबतही आणले. त्यातल्यात्यात गॅलॅपॅगस बेटावर त्यांनी चांगलाच संग्रह केला. त्या संग्रहातील काही वस्तू येथे ठेवलेल्या आहेत. अशा पद्धतीने उत्क्रांतीवादाच्या जनकाला नमन करूनच आपण आत प्रवेश करतो. हे संग्रहालय दोन मजल्यावर विखुरलेले आहे. आपण प्रवेश करतो तेव्हा तळमजल्यावर जातो. त्याच्या खाली एक मजला आहे. तळमजल्यावर लहान लहान प्राण्यांचे नमुने ठेवलेले आहेत. यात समावेश आहे अनेक फुलपाखरांचा. त्याचबरोबर एकपेशीय अमीबापासून अनेक सूक्ष्म प्राणी येथे ठेवलेले आहेत. ते पाहायला सोयीचे व्हावे म्हणून लहान डबीत ठेवलेले असून डबीचे झाकण बहिर्वक्र भिंगाचे बनवलेले आहे. त्याचबरोबर या मजल्यावर अनेक प्रकारच्या स्पंजचा संग्रह आहे. त्यांच्या रंगछटा मन मोहून घेतात. पाण्यात किती विविध प्रकारची जीवसृष्टी आहे याची आपल्याला या प्रदर्शनातून चांगली कल्पना येते.

तळमजल्यावरच्या वस्तू पाहून आपण खालच्या मजल्यावर जाण्यासाठी जिन्याकडे वळतो तोच आपले लक्ष अनेक प्रकारचे पक्षी वेधून घेतात. जिन्याच्या बाजूलाच काचेच्या कपाटामध्ये वेगवेगळे पक्षी मसाला भरून ठेवलेले आहेत. हे पक्षी जिवंत नाहीत याची आपल्याला कल्पना जरी असली तरी ते ज्या पद्धतीने तेथे ठेवलेले आहेत त्यावरून त्यांचा जिवंतपणा आपल्या लक्षात येतो. काही पक्षी फांद्यांवर, काही ढोलीत, काही घरट्यांमध्ये, तर काही उडताना अशा वेगवेगळ्या अवस्थेत त्यांचे प्रदर्शन केलेले आहे. पक्ष्यांमधील एवढी विविधता आम्ही पहिल्यांदाच अनुभवत होतो. आमच्यापैकी प्रत्येकाने किती फोटो काढले असतील याचा अंदाजच करता येत नाही. प्रत्यक्ष पक्ष्यांना स्पर्श करण्याची बऱ्याच विद्यार्थ्यांची इच्छा होती. परंतु ते सर्व काचेच्या कपाटात सुरक्षित ठेवलेले असल्यामुळे ती इच्छा पूर्ण होऊ शकली नाही.



**डार्विनचा बालपणीचा संग्रह**

खालचा मजला प्राण्यांच्या सांगाड्याने भरून गेलेला आहे. सर्वत्र सांगाडेच सांगाडे. त्यामध्ये समावेश आहे रेनडिअर, कोल्हा, माकड, बैल, हत्ती, हरीण इत्यादी प्राण्यांचा. या सांगाड्यांकडे पाहून या प्राण्यांची अंतर्गत रचना कशी असावी याची आपल्याला चांगली कल्पना येते. विविध प्राण्यांच्या रचनेतील साम्य भेद आपल्याला कळतात आणि निसर्गात किती विविधता आहे याची खात्री पटते. आतल्या बाजूला इतर अनेक लहानलहान प्राण्यांचे सांगाडे ठेवलेले आहेत. त्यात समावेश होतो उंदीर, सरडा, मांजर, ससाणा इत्यादी प्राण्यांचा. मसाला भरलेले प्राण्याचे शरीर आणि त्याच्याच बाजूला त्याचा सांगाडा अशी रचना आहे. त्यामुळे या वेगवेगळ्या प्राण्यांच्या हाडांच्या रचनेची चांगली कल्पना आपल्याला येते.

माकडापासून माणूस निर्माण झाला असे उत्क्रांतिवादात सांगितले आहे. हे विधान खरे असेल काय? असे म्हणण्याला आधार काय? असे प्रश्न आपल्याला पडतात. या प्रश्नांची उत्तरे आपल्याला येथे मिळतात. झाडांच्या फांदीवरून लटकणाऱ्या माकडापासून तर दोन पायावर उभ्या राहिलेल्या माणसापर्यंत सांगाडे येथे ठेवलेले आहेत. एकानंतर एक ठेवलेल्या या सांगाड्यांतून उत्क्रांती

कशी होत गेली हे सहज कळते. शरीराच्या कोणत्या भागात बदल होत गेला आणि कोणते भाग कायम राहिले याची स्पष्ट कल्पना येथे येते. विद्यार्थ्यांनी येथे गर्दी केली. अशाप्रकारचे प्रदर्शन ते पहिल्यांदाच बघत होते. त्यांची उत्सुकता पाहून डॉ. विजय बेडेकरांनी त्यांना मानवी शरीराची रचना स्पष्ट करून दाखविली. व्यवसायाने ते डॉक्टर असल्याने त्यांना या बाबींची चांगलीच माहिती होती. माकडाच्या शरीरापासून कसकशी उत्क्रांती होत गेली याची त्यांनी चांगली माहिती दिली.

महाविद्यालयाने केवळ उच्च शिक्षणाचाच विचार करू नये; तर शालेय शिक्षणाचा देखील विचार करावा असा मतप्रवाह इंग्लंडमध्ये सर्वत्र प्रचलित आहे. त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची गोडी निर्माण व्हावी यासाठी महाविद्यालये सतत प्रयत्नशील असतात. वस्तुसंग्रहालये हा त्याचाच एक भाग आहे. त्यातदेखील शालेय विद्यार्थ्यांसाठी ते विशेष प्रयत्न करतात. एखाद्या शाळेने जर त्यांना आधी कळविले तर संपूर्ण संग्रहालय दाखविण्याची सोय केली जाते. लहान लहान प्राण्यांचे सांगाडे कसे तयार करावेत याचे प्रात्यक्षिक दिले जाते. प्राण्यांचे शरीर फॉर्मोलिनमध्ये कसे सुरक्षित ठेवावे याची माहिती दिली जाते. त्याचबरोबर प्राणिशास्त्रांसंबंधीची उजळणी व्हवी म्हणून वेगवेगळे खेळ आयोजित केले जातात. येथे आल्यानंतर विद्यार्थ्यांना वेळ तर मजेत जातोच त्याचबरोबर ज्ञानात भर देखील पडते. आमच्या बरोबर आलेले भारतीय विद्यार्थी याच गोष्टींचा अनुभव घेत होते. हे पाहू का ते पाहू, कशाकशाचे चित्र घेऊ असे त्यांना झाले होते. तरीही त्याच दिवशी आणखी एक संग्रहालय पाहायचे असल्याने आम्ही प्राणिशास्त्र संग्रहालयातून बाहेर पडलो.

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा
वैभव नगरी, कल्याण शीळ रोड, काटई,
ता. कल्याण, जि. ठाणे- ४२१२०४

क्रांतिकारक क्षण ! निमित्त-ऑगस्टचे

## वासुदेव बळवंत फडके

इंग्रज अधिकाऱ्याने आपल्या रजा मंजुरीच्या बाबतीत घोळ घातला नसता तर आजारी आईची शेवटची भेट झाली असती...या विचाराने फडके अत्यंत संतापले. त्याक्षणी हे इंग्रजी राज्यच नष्ट करतो अशी प्रतिज्ञा त्यांनी केली. इंग्रजांविरुद्ध सरळ सशस्त्र बंडच त्यांनी पुकारले. इंग्रजांना त्यांनी त्राही भगवान करून सोडले. त्यांच्या पराक्रमाने इंग्लंडचे पार्लमेंट हादरले. डॅनियल साहेबाला त्यांना पकडायला पाठवले. परंतु त्यालाही त्यांनी गुंगारा दिला. शेवटी १८७९ साली झोपेत असताना ते पकडले गेले. त्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली. एडनच्या तुरुंगांत १७ फेब्रुवारी १८८३ ला त्यांची प्राणज्योत मालवली. हे फडके, म्हणजेच आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके !!

## जयप्रकाश नारायण
## (१९०२-१९७९)

रौलट विधेयकाविरुद्ध भारतात संतापाची लाट उसळली. या विधायकाने भारतीय नागरिकांचे उरले सुरलेले हक्कही इंग्रज सरकारने काढून घेतले. गांधीजींनी याविरुद्ध असहकाराचे शस्त्र उपसले. शाळा, कॉलेजे, कोर्ट-कचेऱ्या, परदेशी कापड यावर नागरिकांनी बहिष्कार टाकावा असे आवाहन गांधीजींनी केले. त्यावेळी जयप्रकाश नारायण इंटरच्या वर्गात होते. त्यांची परीक्षा वीस दिवसांवर आली होती. गांधीजींच्या आवाहनाने जयप्रकाश अस्वस्थ झाले होतेच. आणि त्याचवेळी त्यांनी मौलाना आझादांचे पाटण्याला भाषण झाले, ते ऐकले. ते भाषण ऐकत असतानाच त्यांनी कॉलेज सोडण्याचा निश्चय केला. दुसऱ्या दिवशीच कॉलेजला रामराम ठोकून ते असहकार आंदोलनात उतरले !!

**- संग्रहातून**

# श्रीमत् भगवद् गीता - अध्याय सातवा
# विषय : ज्ञान विज्ञान योग

*कै. शंकरराव मठांच्या गीतेवरील लेख मालेतील सातवा लेख - संपादक*

**श्लोक १ ते ७ : विज्ञान सहित ज्ञान वर्णन**

श्रीकृष्ण म्हणाला,' हे पार्था, माझ्या ठिकाणी मन ठेवून व माझाच आश्रय घेऊन तू योग आचरित असता मला संपूर्णपणे निःसंशय जाणशील ते ज्ञान मी तुला सांगतो, ऐक. मी तुला विज्ञानासहित ज्ञान सांगतो. ते जाणल्याने या लोकी पुनः काही जाणावयाचे शिल्लक राहात नाही. हजारो मनुष्यात एखादाच सिद्धि मिळविण्याचा यत्न करतो आणि प्रयत्न करणाऱ्यापैकी एखादाच मला यथार्थने जाणतो.

पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश, मन, बुद्धी आणि अहंकार या आठ प्रकारांत माझी प्रकृति विभागलेली आहे. हे अर्जुना, जी माझी गौण प्रकृति आहे. याहून निराळी जीवरूप माझी श्रेष्ठ प्रकृति आहे. तिच्याद्धारे हे जगत धारण केले जाते. सर्व भूतमात्र इच्छांपासून उत्पन्न झाले आहे असे तू जाण आणि मी संपूर्ण जगताच्या उत्पत्ती लयाचे कारण आहे. हे धनंजया, माझ्यापेक्षा अधिक श्रेष्ठ असे काहीच नाही. दोऱ्यात जसे मणि ओवावेत तसे हे सर्व माझ्यात ओवलेले आहे.

**श्लोक ८ ते १२ संपूर्ण पदार्थात कारणरूपाने भगवंत व्यापून आहे.**

हे कुंतिपुत्रा, पाण्यामध्ये रस मी, चंद्र सूर्यातील प्रभा मी, सर्व वेदातला प्रणव म्हणजे ॐकार मी आकाशातील शब्द आणि पुरुषातला पराक्रम मी आहे. हे अर्जुना, सर्वभूतांचे सनातन बीज मी आहे असे जाण. पृथ्वीच्या ठिकाणी उत्तम सुवास मी, अग्नीतील तेज मी, सर्व प्राण्यांतील जीवन मी, तपस्वी लोकातील तप मी, बुद्धिमानांची बुद्धि व तेजस्वयांचे तेज मी आहे. आणि मी बलवानांचे इच्छा द्वेष रहित बल आहे. हे भरतश्रेष्ठा सर्व भूतांच्या ठायी धर्मानुकूल वासना मी आहे. सात्विक, रजस, तामस जे गुण आहेत ते सर्व माझ्यापासूनच उत्पन्न होतात असे तू जाण. मी त्यांच्यात नाही पण ते माझ्यात आहेत.

**श्लोक १३ ते १९ आसुरी स्वभावाची निंदा व भगवद् भक्तीची प्रशंसा**

हे भारता आर्त म्हणजे पीडित, जिज्ञासू, अर्थार्थी (भोग इच्छिणारे) आणि तत्त्वज्ञानी असे चार प्रकारचे लोक माझी भक्ती करतात. यांपैकी नित्य समभाव ठेवणारा योगी आणि निष्ठावान ज्ञानी भक्त विशेष श्रेष्ठ होय. ज्ञानी याला मी अत्यंत प्रिय व ज्ञानी मला अत्यंत प्रिय आहे. हे सर्वच भक्त श्रेष्ठ आहेत, ज्ञानी तर माझा आत्माच आहे असे मी मानतो. कारण तो योगी मलाच श्रेष्ठ गति मानून माझाच आश्रय घेतो. जे काही आहे हे वासुदेवच आहे, असे अनेक जन्मानंतर अनुभवास येऊन ज्ञानी मनुष्य मला (ईश्वराला) प्राप्त होतो. असा महात्मा अत्यंत दुर्लभ होय.

या त्रिगुणात्मक भावानी हे सर्व जगत मोहित झाले आहे. जगाच्या पलीकडचा अविनाशी जो मी त्या ईश्वराला ते जाणत नाहीत. ही माझी गुणात्मक दैवी माया दुस्तर आहे. जे मलाच प्राप्त करतात ते ही माया तरून जातात. मायेने ज्यांचे ज्ञान नष्ट झालेले असते असे लोक आसुरी भावाला प्राप्त झालेले दुराचारी मूढ नराधम मला प्राप्त होत नाहीत.

---

भीतीमुळे राग, रागामुळे द्वेष आणि द्वेषामुळे त्रास होतो.

**श्लोक २० ते ३० भगवंताचा प्रभाव व स्वरूप न जाणणाऱ्याची निंदा व जाणणाऱ्याची (स्तुती ) प्रशंसा**

भिन्न भिन्न कामनामुळे ज्यांचे ज्ञान नष्ट झालेले आहे आणि जे आपल्या वासनांच्या आधीन झाल्यामुळे पराधीन झाले आहेत, ते अज्ञानी लोक निरनिराळ्या विधि नियमानुसार इतर देवताना शरण जातात. जे भक्त ज्या स्वरूपाची श्रद्धेने भक्ती करू इच्छितात. त्यांची ती श्रद्धा त्या स्वरूपात मी सुदृढ करतो. तो त्या श्रद्धेने युक्त होऊन त्या स्वरुपाची आराधना करतो आणि त्या योगे माझ्याकडूनच नियम केलेल्या त्या कामना प्राप्त करतो. या अल्पबुद्धी लोकांना जे फळ मिळते ते नाशवान असते. देवाचे भजन करणारे देवांना मिळतात. ईश्वराचे भक्त मला ईश्वराला मिळतात.

माझे श्रेष्ठ अविनाशी अव्यक्त आणि अव्यन्त उत्तम रूप न जाणणारे बुद्धिहीन लोक मला व्यक्त झालेला समजतात. योग मायेने आच्छादित असल्यामुळे मी सर्वांना प्रगट होत नाही. म्हणून हे मूढ लोक अजन्मा आणि अविनाशी असलेल्या मला योग्यरीतीने जाणत नाहीत. हे अर्जुना, मी भूतकाळचे, वर्तमान काळचे, आणि भविष्यकाळचे सर्व प्राणिमात्र यांना पूर्णपणे ओळखतो पण मला कोणी जाणत नाही. हे भारतीय वीरा, सर्व प्राणी इच्छा व द्वेष यांपासून उद्‌भवणाऱ्या सुख दुःखादि द्वंद्वरुप मोहामुळे उत्पत्तीच्यावेळी भ्रम पावत असतात. पण सदाचारी लोकांचे पाप नष्ट झाल्याने ते द्वंद्वाच्या मोहातून सुटून दृढ व्रती होऊन मलाच भजतात.

जे माझा आश्रय करुन जरा मरणापासून मुक्त होण्याचा यत्न करतात, ते त्या ब्रह्माला संपूर्ण अध्यात्माला आणि सर्व कर्माला जाणतात आणि जे अधिभूत, अधियज्ञ आणि अधिदेवासह मला जाणतात ते चित्ताचा योग करणारे मृत्यूसमयीही माझे स्मरण करतात.

आपला भक्त भ्रांत चित्त झाला आहे त्याला सत्यज्ञान करून देणे आवश्यक आहे असे जाणून त्यावर अनुग्रह करण्यासाठी ईश्वराच्या संपूर्ण स्वरुपाचे विज्ञानासहित समग्रज्ञान या अध्यायात सांगितले आहे. ते यथावत् जाणल्या नंतर या जगात आणखी काही जाणण्याजोगे ज्ञान शिल्लक राहत नाही. न इह भूयः अन्यत् ज्ञातव्यं अवशिष्यते। गी.७.३

परमेश्वराचे समग्रज्ञान होणे अत्यंत कठीण आहे. अनंताचे ज्ञान अल्पबुद्धी मानव किती ग्रहण करू शकेल? हजारातून एखादाच हे जाणण्याचा कसून प्रयत्न करतो; असे हे ज्ञान दुर्लभ आहे. मनुष्यानां सहस्त्रेषु कश्चित् यतति सिद्धये।७.३ पुरुष (परमात्मा ३ प्रकृति (शरीर). प्रकृति व पुरुष ही दोन्ही भिन्न मानली जातात. जड व चेतन हा भेद फक्त कल्पना गम्य आहे. गुळ व त्याची गोडी हा भेद कल्पना गम्य कारण गुळ आणि गोडी ही वेगळी होऊ शकत नाहीत. त्याचप्रमाणे विश्व आणि विश्वात्मा भिन्न असू शकत नाहीत. हा भेद आपण मानतो. तो काल्पनिक भेद होय. पाण्यातील रस, सूर्याचे तेज, चंद्राचे चांदणे, पृथ्वीचा गंध, अग्नीची उष्णता, तपस्व्याचे तप, बुद्धिमंताची बुद्धि, बलवानाचे बल, जसे एकरूप तसेच ईश्वर प्रकृतीचा संबंध आहे. या गोष्टी निराळ्या होऊ शकत नाहीत. सूर्य आणि तेज या कल्पनेत भिन्नता आहे वस्तुतः अभेद आहे. जड व चेतन हा भेद काल्पनिक, सद्‌वस्तु एकच. एक सत् विप्रा बहुधा वदन्ति। ईश्वराचे शरीर-पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश, मन, बुद्धि, अहंकार अशी आठ प्रकारची अपरा (गौणं) प्रकृति आहे. जीव ही श्रेष्ठ म्हणजे पराप्रकृति आहे. अशी एकंदर नऊ प्रकारची ईश्वराची प्रकृति म्हणजे विराट पुरुषाचे शरीर आहे. यात जड व चेतन यांची सरमिसळ आहे आणि पृथव्यादी अपत प्रकृति सूत्र-जीव, पराप्रकृति सूत्रात्मा माळेतील सर्व व्यापक सूत अशी ही अखंड मालिका आहे. सूत्रे मलिगणा इव।

इंद्रिय, मन, बुद्धी, आत्मा यांच्या भूमिकेतून याचे विवेचन पाहण्यासारखे आहे. यांच्या भूमिकेतून पंचविध,

त्रिविध, द्विविध व एकत्व याचा अनुभव येतो; याचा अभ्यास करणे आवश्यक.

पंचमहाभूते सर्वत्र आहेत. आपल्या इंद्रियांनी यांच्यातील गुणांचे ग्रहण करता येते. प्राणांनी गंध, त्वचेने स्पर्श, चक्षूने रूप, कर्णाने शब्द व जिव्हेने रस आदि ग्रहण करता येते. येणे प्रमाणे शब्द, स्पर्श रूप, रस, गंध या विश्वातील विषयांचा अनुभव सर्वत्र सर्वांना घेता येतो. हा अनुभव सर्वकालीन व सार्वजनीन आहे. मनुष्याची पांच ज्ञानेंद्रिये शब्दादि पाच गुणांचे ग्रहण करू शकतात. ही पाच तत्त्वे वेगवेगळी आहेत का एकाच सत्य तत्त्वाची आहेत? पाच ज्ञानेंद्रियांच्या संबंधामुळे पाच गुणांचा भास होतो. यापैकी खरे काय? पाच आंधळे व हत्ती याची गोष्ट इथे उपयोगी पडेल. प्रत्येक आंधळया माणसाचा निर्णय त्याच्या दृष्टीने बरोबर होता परंतु वस्तू दृष्ट्या तो योग्य नव्हता. हे डोळस माणसाला ध्यानात येईल. त्याचप्रमाणे ज्याला दिव्यदृष्टी प्राप्त झाली तो म्हणेल की वस्तू तर एकच आहे. नाक, कान आदि इंद्रियांचे अनुभव हे त्यांच्या दृष्टीने आंधळ्या माणसांसारखे आहेत.

मन ज्यावेळी विश्वाकडे पाहाते तेव्हा या पाच प्रकारच्या तत्वांचा त्याला बोध होत नाही. मनाला त्यांच्यातील गुणांचा अनुभव येतो. मनाला वाटते यातले काही सुख देणारे आहेत. (सत्व) काही दुःख देणारे आहेत (तम) आणि काही मिश्र आहेत (रज) अशा प्रकारे विश्व मनाला त्रिविध वाटते. सत्व-सुख, ज्ञान, पवित्र, रज-सुख दुःख मिश्रण, कर्म पवित्र-अपवित्र, थोडक्यात तम-दुःख अज्ञान, अपवित्र या मनाच्या अनुभवाचे संपूर्ण विश्व तीन प्रकारचे भासते. म्हणजे विश्व पाच प्रकारचे नसून त्रिविध आहे. सुखदायी, दुःखदायी व मिश्र. आता प्रश्न असा निर्माण होतो की हे तीन भिन्न पदार्थ आहेत की एकच वस्तू आहे? एकच वस्तू कधी सुखदायक कधी दुःखदायक तर कधी मिश्र अनुभव देणारी असते व ही गोष्ट मनाच्या भूमिकेवर अवंबून राहते. याचा पडताळा प्रत्येकच व्यक्तीला येत असतो.

बुद्धीच्या भूमिकेतून हे विश्व दोन पद्धतीने विनटलेले असल्याचे आढळते. काही जड काही चेतन असे जग बुद्धीला भासमान होते म्हणजे बुद्धीच्या भूमिकेतून द्वंद्वात्मक विश्वाचा अनुभव येतो. जड-प्रकृति-सगुण, चेतन-पुरुष, निराकार, मनाला विविध भासणारी, इंद्रियाना पंचविध वाटणारी विश्व रचना बुद्धीला द्विविध वाटते. हे खरोखर द्विविध आहे का? एकाच सद्वस्तूचे हे भिन्न भव आहेत? नाण्याला दोन बाजू असतात परंतु नाणे मात्र अभिन्नतेने राहते. सद्वस्तू दोन प्रकारांनी विलसते.

**आत्मतत्व** - याला सर्वत्र 'मी' चा अनुभव येतो मी जागृत असतो तेव्हा विश्व दिसते. मी निजतो तेव्हा विश्वही लीन होते. विश्वाचे अस्तित्व माझ्या जागेपणावर अवलंबून. मी ज्ञाता विश्व ज्ञेय, ज्ञात्याशिवाय ज्ञेयाला अस्तित्वच संभवत नाही म्हणजे माझे अस्तित्व आधी मी पाहण्याचा यत्न केल्यावर विश्वाचे अस्तित्व भासते. म्हणून विश्व माझ्या ज्ञानात आहे. माझे ज्ञान माझ्याहून भिन्न कसे असणार? म्हणून आत्मा म्हणतो मीच आहे. माझ्यावाचून विश्व निराळे नाही. मत्तः परतरं नान्यत् किंचिदस्ति धनंजय। अहंभावाचे तत्त्व सर्वत्र आहे. त्याचाच अनुभव पंचज्ञानेंद्रियास, पंचविध, मनाला त्रिविध, बुद्धीला द्विविध असा येत राहतो. म्हणजे मूळची एकच वस्तू आहे. एका बाजूने ती क्षर-नाशवंत आहे. दुसऱ्या बाजूने अक्षर-अविनाशी आहे. ही वस्तू केवळ क्षर वा केवळ अक्षर नाही. या दोन्ही तत्त्वांनी ती युक्त आहे. हा जो एकत्वाचा अनुभव तोच पुरुषोत्तम होय असे गीतेचे प्रतिपादन आहे. हा एकत्वाचा अनुभव हीच दिव्य दृष्टी होय. मनुष्य शरीर भावाने क्षर आहे, आत्मभावाने अक्षर आहे. दोन्ही भाव मनुष्याचा रुपात मिळाले असल्याने मनुष्य पुरुषोत्तम आहे. यात कल्पनामय, या कल्पनाना आधारभूत वस्तू एकच आहे. यासाठी क्षर, अक्षर, पुरुषोत्तम या तीन भिन्न अवस्था आहेत अशी कल्पना न करता ही एकच आहेत. या

सद्वस्तूची यथायोग्य ओळख व्हावी व अनन्य (न+अन्य) भव अंतःकरणात निर्माण होऊन आपण कृत कृत्य व्हावे व अशा प्रकारे दिव्य दृष्टी प्राप्त होऊन संपूर्ण, अखंड, एकरस, तत्वच सर्वत्र आहे, याचा अनुभव घेण्याचा प्रयत्न व्हावा हीच गीतेची शिकवण आहे.

आत्म्यापासूनच द्विविध, त्रिविध, पंचविध निर्माण होतात वा बुद्धी, मन, इंद्रिय यांना भासतात हे लक्षात घेण्यासारखे आहे. यामुळे मनुष्य मोहित होतो. शरीरात केश, व नखे अचेतनासारखी आहेत व इतर शरीर सचेतनासारखे आहे पण या दोन्हीचे कारण एकच आहे. मनुष्य अचेतन व चेतन असे भाव पाहतो पण त्याचे मूळ कारण शोधत नाही हेच त्याचे अज्ञान. स्थूल पहाण्याकडे सहज प्रवृत्ती, सूक्ष्माकडे जावयाची कमी प्रवृत्ति असे जर आहे तर परमात्म्याची उपासना कोण करणार?

या प्रश्नाचे उत्तर–चार प्रकारची उपासना घडते असे गीता प्रतिपादन करते. १) दुःखांनी पिडलेले २) भोग प्राप्तीसाठी ३) तत्व जिज्ञासू ४) ज्ञानी या त्या मनुष्याच्या भूमिका संभवतात. १) पुष्कळ दुःख सतावू लागते तेव्हा मनुष्य ईश्वराची उपासना करतो. निरोगी, विपुल संपत्ती, सुख समृद्धी आहे तोवर मानव ईश्वराचा विचार देखील करत नाही. दुःख सतावू लागताच ईश्वराकडे वळतो. २) परमात्मा हा भेग प्राप्त करून देणारा प्रतिनिधी वाटून काही भोग प्राप्तीसाठी उपासना करतात. ३) ईशतत्व समजून घेणे, मी, जग व ईश्वर यांचा काय संबंध आहे या जिज्ञासेने काही उपासना करतात. ४) ज्ञानी मंडळी अत्यल्प ईश सेवा हेच आमचे जीवन व्रत. तोच कार्य करून घेतो. जे जे काही घडते ती ईश्वरी सेवाच या भावनेने उपासना करणारे.

सर्वजण ज्ञानी भक्त असू शकत नाहीत म्हणजे तो अनन्य होऊ शकत नाही. ही मंडळी जीव व शिव भेद तत्वावर उपासना करतात. याला तनुभक्ती म्हणतात. या भक्तीत मूर्तिपूजा, प्रतिमा पूजा यांचा समावेश होतो. ही उपासना सदोष नाही. सर्वत्र वासुदेवच आहे या भावनेने मूर्तीच्या ठिकाणी भाव उत्पन्न होणे आवश्यक. विश्वात जेवढ्या मूर्ती आहेत यातूनच मानसपूजा घडू शकते नंतर पुरुषोत्तम पूजा हे तेजस्वी स्थान प्राप्त होऊ शकते.

**द्वंद्व मोह** – सर्वत्र वासुदेवच आहे हे निश्चित ज्ञान जोवर झाले नाही तो पर्यंत मनुष्य द्वंद्व भावातच व्यवहार करतो. यामुळे अनेक भांडणे, मी व माझ्याहून भिन्न दुसरा असे दोन पदार्थ आहेत. मी दुसऱ्याचे लुबाडून सुखी का होऊ नये, ही भूमिका निर्माण होते. राष्ट्राराष्ट्रांत युद्धे, दुसऱ्याच्या नाशाने आपली उन्नती करून घेण्याची प्रवृत्ती, धन, जमीन, व्यापार, या संबंधी नित्य सर्वत्र कलह होत असतात. सर्व माणसे इच्छा द्वेष मानून निर्माण होणाऱ्या द्वंद्वभवानी आंधळे वा मोहित होतात. द्वंद्वातून बाहेर पडणे हा एकमेव उपाय आहे. तरच जीवनात शांती निर्माण होईल. द्वंद्व मोहाच्या पापाचे मूळ कारण जगतातून सर्व दुःखाचे निर्मूलन करण्याचा एकमेव उपाय म्हणजे लोकांना ज्ञानाचा परिचय देऊन त्यांच्या ठिकाणी निर्माण झालेला द्वंद्व मोह दूर करणे. दुसरा मार्ग नाही न अन्य पंथाः विद्यते। गीतेचा उपदेश सामाजिक स्वस्थतेच्या दृष्टीने अत्यंत उपयोगी आहे. सामाजिक स्तरावर याचा विचार झाल्यास मानवाची अनेकविध दुःखे नाहीशी होतील.

**कै. शं. बा. मठ**

●●●



भक्ती म्हणजे मन सुधारण्याचा मार्ग आहे.

# साहित्य-जगत

*ग्रंथप्रसारक श्री. शरद जोशी यांनी करून दिलेला दोन ग्रंथांचा परिचय - संपादक*

## ‘तीर्थे महाराष्ट्राची’ - एक अपूर्व ग्रंथराज

तीर्थे महाराष्ट्राची हा एक संग्राह्य ग्रंथराज श्री. अनंत गोपाळ मोहिते (४१/इंद्रायणी हौसिंग सोसा. सागर नगर, अप्पर डेपोपाडा, विठ्ठल मंदिराशेजारी, पार्क साईट, विक्रोळी (प.), मुंबई-४०००७९ भ्रमणध्वनी :९३२४७३१८४८) यांनी लिहिलेला आहे. (पृ.२८४, मूल्य रु.३००/-). प्रकाशक आहेत श्रीमती वर्मा सत्याळकर (ए डिव्हिजन ऑफ मैत्रेय मास कम्युनिकेशन, पारधी हाऊस, तिसरा मजला, एम.जी.रोड, जैन मंदरासमोर, विलेपार्ले (पू.), मुंबई-४०००५७ दूरध्वनी :०२२-२६१०१०१६/२६१५०३५८) १५ ऑगस्ट २०११ रोजी याची प्रथम आवृत्ती प्रसिद्ध झाली. (आता दुसरी आवृत्ती प्रसिद्धीच्या वाटेवर आहे.)

## पुस्तक लिहिण्याचा संकल्प

महाराष्ट्र हा संतमहंतांचा, ऋषी-महर्षि, शूर-वीरांचा, आचार्यांचा, तत्वज्ञांचा, सह्याद्री-सातपुडा यांनी कणखर बनलेला देश, ज्ञानेश्वर-तुकोबांच्या अमृतवाणीने कृतार्थ झालेला देश म्हणून प्रसिद्ध आहे. बहु असोत सुंदर संपन्न की महा, प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा।’ असे महाराष्ट्र देशाचे वर्णन केले जाते, ते सार्थ आहे. महाराष्ट्राची धार्मिक परंपरा ही वैभवशाली आहे. राज्यात लहान-मोठी अनेक देवस्थाने असून वर्षभर सण, उत्सव, यात्रा अनेक ठिकाणी होत असतात. बारा ज्योतिर्लिंगापैकी पाच ज्योतिर्लिंगे महाराष्ट्रात आहेत. श्रीशंकर, श्रीगणेश इ. देवतांची उपासना करणारे लाखोनी भाविक महाराष्ट्रात आहेत. लेखक अनंत गोपाळ मोहिते ‘मनोगता’त म्हणतात. ‘प्रस्तुत पुस्तक लिहिण्याचा संकल्पच मुळी असा आहे की भाविकांना चौफेर दृष्टीने तीर्थक्षेत्र न्याहाळण्याची दृष्टी प्राप्त व्हावी, अनुभव ग्रहणाचा, जीवनदृष्टीचा प्रयत्यय यावा, तीर्थस्थळांभोवती गुंफलेले ऐतिहासिक, धार्मिक,सांस्कृतिक व भौगोलिक महात्म्य कळावे. तसेच या पुस्तकाच्या वाचनातून तीर्थयात्रा करण्याची जिज्ञासा निर्माण व्हावी अशी अपेक्षा आहे. महाराष्ट्राचा विविधांगी परिचय करून घेतल्याने यात्रिकांना तीर्थयात्रा करण्याची प्रेरणा मिळाली, तर माझ्या संकल्पाच्या श्रमांचे सार्थक झाले असे म्हणता येईल!

लेखकाचे हे पहिलेच पुस्तक उत्तमरित्या सजलेले आहे. त्याबद्दल त्यांचे व त्यांच्या सर्व साहाय्यकांचे मनःपूर्वक अभिनंदन. (या संग्राह्य पुस्तकाची दुसरी आवृत्ती लवकरच प्रसिद्ध होत आहे. ही वाचकांच्या दृष्टीने अत्यंत आनंदाची गोष्ट आहे.)

## पुस्तकाचे अंतरंग

पुस्तकाच्या २८४ पृष्ठांमध्ये सहा विभाग केलेले आहेत. त्यांतील पहिल्या भागात अष्टविनायकांची स्थानं दिलेली आहेत. (मोरगाव, सिद्धटेक, पाली, महड, थेऊर, लेण्याद्रि, ओझर व रांजणगाव) विभाग दोनमध्ये ५ ज्योतिर्लिंगांची नावे आहेत. (भीमाशंकर, परळी वैजनाथ, औंढ्या नागनाथ, त्र्यंबकेश्वर, घृणेश्वर). विभाग तीनमध्ये तीन आदिमायांची साडेतीन शक्तिपीठे व इतर स्थानांची माहिती दिलेली आहे. (तुळजापूर, कोल्हापूर, माहुर, वणी, अंबेजोगाई, मांढरादेवी व जीवदानी) विभाग चारमध्ये श्रीदत्त क्षेत्रांची नावे (कारंजा, नृसिंहवाडी, अक्कलकोट,

औदुंबर, गाणगापूर, जानपीर व मढी) आहेत. विभाग पाचमध्ये संतांची वास्तव्यस्थाने (पंढरपूर, देहू, आळंदी, पैठण, शेगाव, शिर्डी, पावस, नेवासा, शिवथर घळ, सज्जनगड व चाफळ) दिलेली आहेत. विभाग सहामध्ये अन्य धार्मिक स्थळांची (ज्योतिबा, जेजुरी, परशुराम, शिखर शिंगणापूर, मार्लेश्ववर, पंचवटी, हरिहरेश्वर व गणपतीपुळे) नावे दिलेली आहेत.

### उत्कृष्ट लेखनशैली

लेखकाची भाषा अत्यंत सुबोध व सकस आहे. मनोगतात म्हटल्याप्रमाणे तीर्थस्थानांची सर्वप्रकारची माहिती वाचताना आपण गुंग होऊन जातो. तीर्थस्थानांच्या माहितीसंबंधी अनेक पुस्तके आजवर प्रसिद्ध झाली असतील परंतु जवळजवळ ५० तीर्थस्थळांची माहिती एकत्रितपणे देणारे कदाचित हे पहिलेच पुस्तक असावे! लेखकाची लेखन शैलीही अजोड आहे. त्यांच्या वर्णनाची भाषा ही मनाला भुलविणारी आहे व आपल्याला (वाचकाला) त्या तीर्थाची भेट घ्यायलाच पाहिजे असे प्रकर्षाने वाटायला लावणारीआहे. त्याचे प्रत्यंतर अर्पण पत्रिकेपासूनच येते. ती अर्पण पत्रिका अशी :-

दगडासारख्या कठोर माध्यमाला मृदु संवेदनशील घडविणाऱ्या त्या महान शिल्पकारांजवळ न जाणो कोणती अद्‌भुत हत्यारे होती की त्यांनी अथक परिश्रमाने व कौशल्याने त्या निर्जीव पत्थरांतून अप्रतिम, अलौकिक आणि अनुपम शिल्पाकृती साकार करून मानवी मनाच्या स्पंदनशीलतेची संपन्न प्रतीकं निर्माण केली. त्या शिल्पकारांच्या साधनेला उत्साहाला आणि तन्मयतेला अखंड विश्वात तोड नाही. त्या अज्ञात, प्रतिभावंत, शिल्पकारांच्या पुण्यस्मृतीस हे पुस्तकरुपी भावपुष्प सविनय समर्पित! 'ब्लर्ब'वरील मजकूरसुद्धा असाच वाचनीय आहे. तो असा -

> 'नुपा पापकृतां तीर्थोपापस्थ क्षमनं भवेत।
> यथोक फलद तीर्थ भवेत् शुद्धात्मनां नृणाम्।

ज्याच्या योगाने पापापासून तरून जाता येते ते, तीर्थ!

या महाराष्ट्राला समृद्ध आणि दीर्थ अशी सहिष्णुता संतांनी प्राप्त करून दिली. संस्कृती, भक्तिमार्ग, समाजजागृती, विचारप्रणाली इ. क्षेत्रात ज्या संत व्यक्तींनी आपला ठसा उमटविला त्या महाराष्ट्र देशाचे वर्णन काय करावे? महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणूनच ओळखले जाते. अशा या मंगल देशात अशी अनेक देवस्थाने आहेत, की त्यांना स्वतःचा इतिहास आहे. महात्म्य आहे. त्यामुळेच ती गेल्या अनेक पिढ्या महाराष्ट्रातील सर्वसामान्य माणसाच्या हृदयात सर्वोच्च श्रद्धास्थान म्हणून वसलेली आहेत. बहुतेक तीर्थस्थानं ही प्राचीन आहेत. त्यांना शेकडो वर्षांची परंपरा लाभलेली आहे. प्रामुख्याने अष्टविनायक मंदिरे, देवीची साडेतीन पीठ, चंद्रपूरचे विठ्ठलमंदिर, ज्योतिर्लिंगे, खंडोबाची स्थाने, शनिमंदिरे, दत्तात्रय, नवनाथ यांची स्थाने तसेच शिर्डी, गणपतीमुळे यांसारखी भक्तांसाठी असणारी जागृत देवस्थाने यांची विस्तृत माहिती या पुस्तकांत आहे. या तीर्थांच्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन मोठे समाधान तर मिळतेच. पण तसे जाणे शक्य नसेल तरी या पुस्तकातील उत्कृष्ट माहितीमुळे वाचक-श्रद्धाळूंना मानसयात्रा नक्कीच घडेल.'

### अविश्रांत कष्ट घेऊन केलेली निर्मिती

पुस्तकातील उत्कृष्ट माहिती जमविताना त्यांनी खूप कष्ट घेतलेले आहेत हे निश्चितपणे जाणवते. शेवटी पृ. २८० वर संदर्भसूची दिलेली आहे. जिज्ञासू वाचकांना ती उपयोगी पडावी म्हणून पुढे देत आहे.

१) 'मानसयात्रा' - ले. रामचंद्र चिंतामण ढेरे (प्रकाशक इंद्रायणी साहित्य, पुणे. प्र.आ.२४.१२.१९७७)

२) 'तीर्थरूप महाराष्ट्र' - ले. पं. महादेव शास्त्री जोशी - (प्रका. अनमोल प्रकाशन, पुणे - भाग १ व २ आवृत्ती १९९५)

३) आद्य ज्योतिर्लिंग त्र्यंबकेश्र - पं. त्र्यंबक शास्त्री पाटणकर आवृत्ती १९९३, ४)

---

जीवनात यश कायम नसते. तसेच अपयशही अंतिम नसते. जोवर तुमचा विजय इतिहास बनत नाही. तोवर प्रयत्न करणे थांबवू नये.

४) 'गाजती दैवते' – पं. महादेवशास्त्री जोशी (अनमोल प्रकाशन, पुणे आवृत्ती १९९५)

५) 'पैठण दर्शन – डॉ. रा. श्री. मोरवंचीकर – पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभाग महाराष्ट्र शासन आवृत्ती १९८५. याशिवाय विविध विशेषांक दिवाळी अंक व नियतकालिके यांचाही मला उपयोग झाला या सर्वांचा मी ऋणी आहे.'

**महाराष्ट्रातील तीर्थांची समग्र माहिती देणारे पुस्तक**

कोणताही वाचक या पुस्तकाच्या प्रेमात पडेलच! या पुस्तकातील कोणतेही पान काढून वाचा, तुम्हांला मनस्वी समाधान मिळेल आणि म्हणून लेखकाचे पुनश्च एकदा अभिनंदन. त्यांनी अशीच अनेक उत्तमोत्तम पुस्तके लिहून मराठी साहित्यात मोलाची भर घालावी ही विनंती. त्यांची काही पुस्तके येत्या एकदोन महिन्यांत प्रसिद्ध होणार आहेत. त्यांच्या आणखी ६/७ पुस्तकांची हस्तलिखिते तयार आहेत. महाराष्ट्रातील प्रकाशकांनी त्यांच्याशी त्या संबंधात जरूर संपर्क साधावा ही त्यांना नम्र विनंती. शेवटी या पुस्तकातील अनेकांपैकी एका सुंदर परिच्छेदाचा (महाराष्ट्राचे स्फूतिस्थान–शिवथरघळ – पृ.२२०) उल्लेख करण्याचा मोह आवरू शकत नाही. तो परिच्छेद असा :–

'सतराव्या शतकात ज्यांनी महाराष्ट्राला सामर्थ्याचा महामंत्र दिला आणि मराठी मनात चेतना फुलविली. त्या समर्थांच्या संपर्काने पुनीत झालेली अनेक स्थाने महाराष्ट्राच्या पंचक्रोशीत आहेत. चाफळचा राम, कृष्णा–कोयनेच्या खोऱ्यातले अकरा मारूती आण प्रतापगडची रामवरदायिनी भवानी, ही तर त्यांनी निर्मिलेली रामराज्याची स्फूर्तिस्थानं आज काहीशी उपेक्षित असली तरी त्यांच्या मनाची चैतन्यगर्भ स्फुरणं जशी या स्फूर्तिस्थानांतून प्रतीत होतात, तशीच त्यांच्या अंतर्मनांची स्पंदन आपल्याला त्यांच्या एकांत निवासाच्या स्थानीही जाणवतात.

**जागतिक कीर्तीचे गणित तज्ज्ञ व मराठी भाषा संशोधक, डॉ. सदाशिव गजानन देव लिखित 'ज्ञानभाषा मराठी' श्रेष्ठ दर्जाचा एक ग्रंथ.**

गिरीश कुबेर यांच्या हस्ते दि. १६.६.२०१३ रोजी डोंबिवली येथे वर उल्लेखिलेला 'ज्ञानभाषा मराठी' (ले. डॉ. सदाशिव गजानन देव, 'मनीषा', आंध्र बँकेजवळ, सारस्वत नगर, डोंबिवली (पू.)–४२१२०१ मो. ९८८११५८२२५) हा एक अव्वल दर्जाचा ग्रंथ प्रकाशित झाला. डोंबिवली ग्रंथ संग्रहालय (विष्णू नगर पोलीस चौकीचे वर, डोंबिवली–प., जि. ठाणे – ४२१२०२, फोन नं. ०२५१–२४८३५७२) तर्फे 'लेखक आपल्या भेटीला' या उपक्रमांतर्गत हा प्रकाशनाचा कार्यक्रम झाला. 'लोकसत्ता' चे संपादक गिरीश कुबेर यांच्या हस्ते ग्रंथाचे प्रकाशन झाले. त्याप्रसंगी ते म्हणाले, 'धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक चर्चा केल्या म्हणजे भाषा टिकतात हा गैरसमज आहे. साहित्य संमेलनांमध्ये भाषा या विषयावर परिसंवाद झडतात. प्रत्यक्षात अशा परिसंवादातून फारसे काहीही साध्य होत नाही. भाषा जगविण्यासाठी भाषेचे वैभव फुलविण्यासाठी त्याला अर्थव्यवस्थेचे भक्कम पाठबळ असणे आवश्यक आहे.' या प्रसंगी ग्रंथ संग्रहलयाचे अध्यक्ष आबासाहेब पटवारी, पितांबरीचे व्यवस्थापकीय संस्थापक रवींद्र प्रभूदेसाई, 'पद्मगंधा' प्रकाशनाचे (१९६६, तारा भुवन, माडीवाले कॉलनी, सदाशिव पेठ, पुणे–४११०३०, फोन नं. ०२०–२४४५०२६०) अरुण जाखडे उपस्थित होते. धो धो पाऊस पडत असतानाही शुभमंगल कार्यालयात साहित्य रसिकांनी एकच गर्दी केली होती.

श्री. गिरीश कुबेर पुढे म्हणाले, 'साम्राज्यशाहीत भाषांना भक्कम आर्थिक पाठबळ होते. त्यामुळे त्यांच्या भाषा टिकल्या. साम्राज्ये लयाला गेल्यावर त्यांच्या भाषाही मृतप्राय झाल्या. आपली अर्थव्यवस्था समक्ष आहे. त्यामुळे भाषा जगविण्याचा विचार प्राधान्याने झाला पाहिजे.

---

या जगात तुमच्या यशाच्या वाटेवर लोक नेहमीच दगडफेक करतील. पण त्या दगडांपासून भिंत बनवायची की पूल बांधायचे ते तुमच्यावरच अवलंबून आहे.

अन्यथा या भाषाही लयाला जातील. बाजारपेठा विस्तारतात त्याप्रमाणे भाषांचाही विकास होत असतो. प्रत्येकाने आपल्या परीने नवीन शब्द पेरण्याचा प्रयत्न केला तर त्याचा उपयोग होतो.'

**प्रा. संध्या टेंबे यांचा डॉ. देवांशी संवाद**

मराठी भाषेच्या अस्तित्वासंबंधी व भविष्यासंबंधी जेंव्हा चर्चा होते. त्यावेळी मराठीला 'ज्ञानभाषा' करण्याचा संकल्प मांडला जातो. परंतु त्यासाठी नेमके काय केले पाहिजे ह्यासंबंधी लेखन व प्रयत्न अल्प प्रमाणात झाले आहेत असे देव यांचे म्हणणे आहे. या समारंभात ग्रंथ संग्रहालयाच्या 'ध्यास' या मासिकाच्या संपादिका प्रा. संध्या टेंबे यांनी डॉ. देव यांचयाशी संवाद साधला तेंव्हा ते म्हणाले, 'जगातील कोणत्याही भाषेच्या निर्मितीचे प्रमेय एकच आहे. भाषा माणसाने निर्माण केल्या आहेत. भाषेला जीवशास्त्रीय संपर्क असतो. भाषेवर सरकारचे कोणतेही बंधन नसते. आत्मप्रकटीकरणासाठी भाषेची निर्मिती झाली आहे. त्यामुळे या भाषांचा विस्तार झाला पाहिजे विदेशांत मातृभाषांना मातेचा दर्जा आहे. भारतात मात्र मातृभाषेचा अनादर केला जातो. युरोपातील ४२ ज्ञानभाषांपैकी २८ राजभाषा आहेत. गणित व भाषा या समाजाला देणग्या आहेत. भाषेच्या अभ्यासातून नवीन विषयांची निर्मिती होते. संशोधनामध्ये भाषांचे वैभव दडलेले असते. अमेरिकेत अशा प्रकारचे संशोधन होऊन ते आपल्याकडे अर्थकारणातून विकले जाते. त्या बळावरच अमेरिका आपली श्रीमंती टिकवून आहे. भारतात मात्र अशा प्रकारचे मूलभूत संशोधन होत नाही. भारताच्या वैभवाच्या कोणी कितीही गप्पा मारल्या तरी जोपर्यंत आपण संशोधनाला महत्व देत नाही. तोपर्यंत भाषेचे व भारताचे वैभव कदापि प्रत्यक्षात उतरणार नाही. पुढे उल्लेखिलेल्या प्रकरणातून मौलिक विचार मांडून वाचकाला उत्तम मार्गदर्शन केलेले आहे.

**ज्ञानभाषा मराठी ग्रंथाचे अंतरंग**

२९५ पृष्ठांच्या (मूल्य रु.३००/-) या ग्रंथातील १० प्रकरणे अशी :-

१. न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते।
२. संस्कृत भाषा देवे केली.
३. देखिला अक्षरांचा मेळावा
४. ज्ञानदेवे रचिला पाया
५. महाराष्ट्र धर्म वाढवावा
६. जो दुसऱ्यावरी विसंबला!
७. प्रपंचे ज्ञान ते विज्ञान
८. आणि ग्रंथोपजीविये
९. मराठी पाऊल पडते पुढे
१०. क्रियेविण वाचाळता व्यर्थ आहे.

शेवटी संदर्भ सूची देण्यात आलेली आहे. ती अत्यंत महत्वाची आहे. त्यांत १०१ मराठी व १७ इंग्रजी ग्रंथांची यादी दिलेली आहे. अभ्यासू व जिज्ञासू वाचकांनी ती अवश्य वाचावी. (गणितीय भाषा विज्ञानाच्या ६ संदर्भ ग्रंथाची नावे ही पृ. २०५-६ वर दिलेली आहेत. अभ्यासकांनी ती ही अवश्य वाचावी.) धन्यवाद.

**मराठी भाषा ज्ञानभाषेच्या स्तरावर जावी. यासाठी काय करावे?**

मराठी भाषा ज्ञानभाषेच्या स्तरावर जावी ह्यासाठी ह्या पुस्तकातील विविध प्रकरणांतून चर्चा केली आहे. नव्या पिढीला ज्ञानभाषेच्या जवळ जाण्यासाठी कोणत्या व्यवस्थांची गरज आहे ती स्पष्ट करणे एवढेच ह्या ग्रंथाचे स्वरूप आहे हे सांगून डॉ. देव पुढे म्हणतात, ' लोकभाषा हीच ज्ञानभाषा व शासनाची भाषा असावी व त्या भाषेचा विकास लोकविकासाशी एकरूप झालेला असावा अशी अपेक्षा नवमहाराष्ट्राचे निर्माते कै. यशवंतराव चव्हाण ह्यांनी व्यक्त केली होती. त्यांच्या विचारांचे मोल लक्षात घेऊनच हा लेखन प्रकल्प ह्या पुस्तकाच्या रूपाने सिद्ध झाला आहे.

जेव्हा मोठा पाऊस होतो, तेव्हा सगळे पक्षी निवाऱ्यासाठी जागा शोधायला लागतात. पण गरूड मात्र खूप उंच उडतात आणि ढगांच्याही वर जातात... त्यांची समस्या सारखीच असते; मात्र 'ॲटिट्यूड' वेगळा असतो!

ही चर्चा अधिक पूर्णतेकडे गेली व मराठीला 'ज्ञानभाषा' बनवता आली तर पुस्तक प्रकाशित करण्याचा हेतू साध्य झाला असे म्हणता येईल अशी अपेक्षा त्यांनी शेवटी व्यक्त केली आहे.

**वि. वा. शिरवाडकर यांचे मननीय विचार**

पुस्तकाच्या सुरवातीलाच आदरणीय वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांचे मननीय विचार उधृत केले आहेत ते असे :-

'इंग्रजी भाषेत शिकलेल्यांना ना जमिनीवर टेकायला पाऊल असते ना आकाशात झेपायला पंख असतात. माझ्या मायभाषेच्या या प्रदेशात, माझ्या जडणघडणीच्या आधारे, मी इंग्रजी भाषेचे स्वागत करतो. माझ्या एकूण भाषा व्यवहारात मी आवश्यक तेथेच इंग्रजी भाषा अनुकूल करून उपयोजीन. वैभवी, संपन्न आणि गतिमान संस्कृतीचे लक्षण आपल्या संस्कृतीत जे जे गौरवपूर्ण, चेतनादायक असेल ते ते टिकवणे व ते ते पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे आणि जे जे नवीन येईल ते ते आपल्या समाजाला अनुकूल करुन स्वीकारणे.

प्रत्येक मराठी माणसाने हा अलौलिक ग्रंथ वाचणे व शक्य झाल्यास संग्रही ठेवणे जरुरीचे आहे. सर्व ग्रंथालयांनी तर तो आपल्या संग्रही अवश्य ठेवावा अशी त्यांना विनंती आहे. एका मौलिक ग्रंथाची भर मराठी साहित्यात घातली त्याबद्दल डॉ. देव व प्रकाशक अरुण जाखडे यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

**डॉ. सदाशिव गजानन देव यांचा अल्प परिचय**

व्यवसाय प्राध्यापक, संशोधन, मार्गदर्शक, शैक्षणिक कार्य - मुंबई, मराठवाडा व गोवा विद्यापीठात पदव्युत्तर विभागात अध्यापन, युनिव्हर्सिटी ऑफ ऑलाजेब्रा (कॅनडा), युनिव्हर्सिटी ऑफ टेक्सास (युएसए) आणि फ्लोरिडा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या विद्यापीठांत सात वर्षे उच्चस्तरीय गणित विषयाचे अध्ययन.

**ग्रंथनिर्मिती** - गणित विषयावरील सहा ग्रंथ जर्मनी, नेदरलँड आणि भारत येथील संस्थांनी प्रसिद्ध केले. 'कोशवाङ्मय-विचार आणि व्यवहार' सुपर्ण प्रकाशन, प्रकाशन वर्ष २००० (पृ. ४५०) व्याख्याने आणि लेख व शोध निबंध. गणित विषयावर परदेशांत अनेक व्याख्याने, मराठीत २५ लेख व शोध निबंध प्रसिद्ध झाले आहेत.

**श्री. शरद जोशी (ग्रंथ प्रसारक)**
५, अमर कल्पतरू सोसायटी,
देवी चौक, शास्त्रीनगर,
डोंबिवली - ४२१२०२
दूरध्वनी : ९५२५१२-४८६९६७

●●●

निमित्त-ऑगस्टचे

**गांधीजींच्या जीवनातला तो क्रांतिकारक क्षण !**

आगगाडीच्या पहिल्या वर्गाचे तिकिट काढून गांधीजी प्रिटोरियाला कोर्ट कामासाठी निघाले, पण मॅरित्सबर्ग स्टेशनवर त्यांना 'काळा' माणूस म्हणून धक्के मारून सामानासह खाली फेकण्यात आल. वेटिंगरुममध्ये कडक थंडीत रात्रभर जागून गांधीजी विचार करीत होते. अपमानित अवस्थेत भारताला परत जाण्यापेक्षा गोऱ्यांच्या वर्णद्वेषाविरुद्ध सर्व शक्तिनिशी लढण्याचे त्यांनी ठरवले. हा क्षण त्यांच्या जीवनात क्रांती घडवणारा होता. दक्षिण आफ्रिकेत त्यांनी सत्याग्रहाचे नवे पर्व सुरू केले.

कृष्णवर्णीय नेल्सन मंडेला त्याच दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष झाले आणि गांधीजींच्या त्या सत्याग्रह पर्वाची यशस्वी सांगता झाली !!

**- संग्रहातून**

बालक दिवसात साधरण चारशे वेळा हसते आणि प्रौढ व्यक्ती दिवसाला साधारण पंधरा वेळा हसतात. आपले हास्याचे हे ३८५ क्षण कुठे हरवतात?

# श्री. विवेक कुलकर्णी यांना अनावृत पत्र

*अमेरिकेत कर्तृत्व गाजवणाऱ्या मराठी माणसाला लिहिलेले हे पत्र आहे. अशी मराठी माणसासाठी काही करू शकणारी मंडळी एकत्र यावीत असे लेखिकेस वाटते – संपादक*

''हॅलो'', – आई

''आई, मी अमोल बोलतोय''– मुलगा

''कसा आहेस तू? किती दिवसांनी फोन येतोय तुझा! नोकरीचं काही जमलं का?'' – आई

'मी ठीक आहे. तू कशी आहेस? जॉब सर्च चालू आहे पण अजून इथे मार्केट डाऊन आहे. नवीन रिक्रुटमेंट नाहीच सध्या. प्रयत्न चालू आहेत. बघायचं काय होतय! जुलैपर्यंत व्हिसा आहे.' – मुलगा.

फोनवरचा हा संवाद आहे अमेरिकेत M.S. पूर्ण करून नोकरीच्या शोधात असलेल्या मुलाचा नि त्याच्या भारतात असलेल्या आईचा. ११ सप्टेंबरला झालेल्या अमेरिकेतल्या 'वर्ल्ड ट्रेड सेंटर'च्या विमान हल्ल्यापासून हीच परिस्थिती आजतागायत आहे. गेल्या दिवाळीलाच त्याच M.S. तो पूर्ण करणार होता पण जॉब मार्केट डाऊन झाल्यामुळे त्याने 'मे' शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर दुसरी दिवाळी येऊन गेली तरी काही सुधारणा नाही.

'हॅलो' – आई

'आई, अमोल बोलतोय कशी आहेस?'

'तू कसा आहेस? मी ठीक. जॉब मार्केटमध्ये काही सुधारणा!'

'नाही आई, इथे जॉब फेअर भरतात. तिथे गेलो होतो दोन तीनदा. शिवाय इंटरनेटवर सर्च चालू आहेच. अगं सगळा इंटरव्ह्यू होतो नि शेवटी विचारतात, 'U.S. सिटिझन्स आहात का?' 'पाच सहा वर्षाचा अनुभव आहे का?'

'ह्या दोन्ही गोष्टी अशक्यच आहेत. म्हणजे या ना त्या प्रकारे नाहीच.'

'हॅलो! अमोल काही दिवसापूर्वी पेपरमध्ये फ्रंट पेजवर ठळक कॉलममध्ये एक बातमी वाचली. 'अमेरिकेत एका भारतीयाने स्वकर्तृत्वाचा झेंडा फडकवला.' या मथळ्याखाली फोटोसह माहिती होती ती अशी – श्री. विवेक कुलकर्णी हे भारतीय, अगदी मुंबईकर दादरचे राहणारे 'IIT पवई' तून त्यांनी बी.टेक केले. गेली २५ वर्षे ते अमेरिकेत स्थाईक आहेत. जगातल्या ज्या अग्रगण्य ५० कंपन्या आहेत त्यात २० व्या क्रमांकावर असलेल्या कंपनीत ते मोठ्या अधिकार पदावर आहेत. त्यांच्यामुळेच कंपनीची थरथराट झालीय. तुझ्या कॅलिफोर्नियातच ते आहेत– आई

'हो का, बघायला पाहिजे' – मुलगा

'त्यांचा ई–मेल ॲड्रेस वा फोन नं. दिलेला नाही. पण त्यांच्या कंपनीचे नाव दिलेले आहे. त्यावरून त्यांची माहिती काढ. त्यांना कॉन्टॅक्ट कर. एक भारतीय, मुंबईकर मराठी माणसाने दुसऱ्या भारतीय मुंबईकर मराठी माणसाला नोकरीसाठी काही मदत केली तर बघ. निदान काही मार्गदर्शन तरी ते करतील. ते फार उच्च पदावर आहेत. त्यांच्यापर्यंत पोहचणेच कठीण आहे. पण त्यांच्या हातात अधिकारही आहेत. बघ काही जमलं तर' – आई

'आई, मी माहिती काढतो, प्रयत्न करतो. पण मी एकटाच थोडा आहे इथे भारतीय मराठी माणूस की त्यांनी भारतीय मराठी माणूस म्हणून मला नोकरी द्यावी! इथे लाखो

तुमचा कालचा दिवस गेला आणि उद्या येणार की नाही कोणाला माहीत आहे? त्यामुळे आजचा दिवस भरभरून जगा...आणि तो आनंदाने भरून टाका.

मुले नोकरीच्या शोधात आहेत. माझ्या आधीच्या बॅचच्या मुलांना पण नोकऱ्या मिळालेल्या नाहीत अजून'– मुलगा

माझ्या आपलं मनात आलं ते काही करू शकतील म्हणून. मला त्यातलं जास्त काही समजत नाही पण वाटलं श्री. विवेक कुलकर्णी एक भारतीय मराठी माणूस एवढ्या अग्रगण्य कंपनीत उच्च पदावर आहेत. त्यांच्या हातात अधिकार आहेत तर कां त्यांनी भारतीय मुलाचं पर्यायाने भारताचं पण भलं करू नये? भारतीय विद्यार्थी हुशार आहेत (U.S.विद्यार्थ्यांपेक्षा काकणभर जास्तीचे) उच्च शिक्षण घेतलेले आहेत. सध्याच्या परिस्थितीत ते भारतीय म्हणून त्यांना कोणी घेतले जात नाही. (फ्रेश बी. ई. होऊन पोस्ट ग्रॅज्युएशन केलेल्या मुलांना पाच वर्षाचा एक्सपिरिअन्स कसा असू शकेल?)

आम्हाला श्री. विवेक कुलकर्णी यांचा त्यांच्या कर्तृत्वाचा अभिमान आहे. कौतुक आहे, आदरही आहेच. त्यांनी हे आव्हान पेलावं. लाखोतल्या हजारांना, निदान शंभरांना तरी त्यांनी नोकऱ्या द्याव्यात. भारतीय हुशार विद्यार्थ्यांसाठी त्यांनी नवीन कंपनीच काढावी व सर्वांना सामावून घ्यावं. आपल्या अधिकाराचा सुयोग्य वापर (सध्याच्या परिस्थितीत) करून त्यांनी भारतीयाचं पर्यायानं भारताचं भलं करावं. ही सुयोग्य संधी चालून आली आहे त्यांना. त्यांच्या जागतिक कीर्तीला चार चाँद लागतील. धन्यवाद.

**टीप** : हे पत्र श्री. विवेक कुलकर्णी यांच्यापर्यंत पोहचेल की नाही माहीत नाही. पण दादरला राहणारे त्यांचे भाग्यवान माता पिता तरी नक्कीच वाचतील. त्यांनी हे 'आवाहन' (हा मजकूर) त्यांच्यापर्यंत पोचवावे.

**श्रीमती आशा भिडे**
बी/९ विजय अर्पाटमेंटस्,
ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी – २५४१०१४०
मोबाईल –९३२४०४४७६४

●●●

क्रांतिकारक क्षण ! निमित्त–ऑगस्टचे

## कर्मवीर भाऊराव पाटील (१८८७–१९५९)

श्रीमंतांच्या घरांवर धाडी घालून मिळवलेला सर्व पैसा सत्यप्पा बेरड गोरगरिबांना देऊन टाकी. या सत्यप्पाची आणि भाऊंची दोस्ती कशी? त्याला भेटायला भाऊ एकदा तुरुंगात गेले होते. त्यावेळी त्यांचे काय बोलणे झाले? हे कोणालाच माहीत नाही. पुढे सत्यप्पाला फाशी झाली. सत्यप्पा अशिक्षित होता पण गरिबांसाठी फाशी गेला. त्यामुळे भाऊ फार हळहळले. सत्यप्पाने भाऊंच्या हृदयात त्या एका क्षणी करुणा निर्माण केली. याच करुणेतून रयत शिक्षण संस्थेचा वटवृक्ष फुलला. त्यामुळे हजारो गरीब विद्यार्थ्यांना विद्येची सावली मिळाली. हे भाऊ, म्हणजेच कर्मवीर भाऊराव पाटील !!

## एस्. एम्. जोशी (१९०४–१९८९)

१९२७ सालच्या 'गो बॅक सायमन' च्या चळवळीत पुण्यात एस्.एम्.जोशी प्रत्यक्ष राजकारणात आले. त्याच सुमारास त्यांनी युसुफ मेहेरअल्लींचे भाषण ऐकले. त्या भाषणाचा त्यांच्या भावी जीवनावर फार परिणाम झाला. ते संपूर्ण लोकशाहीवादी आणि राष्ट्रवादी झाले. अनेक वेळा स्वातंत्र्य लढ्यात भाग घेऊन त्यांनी कारावास भोगला. बेचाळीसच्या आणि संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचे तर ते लोकमान्य व ज्येष्ठ नेते होते. त्यागी, चारित्र्यवान आणि झुंजार नेता म्हणून जनतेने त्यांचा गौरव केला. हे एस्.एम्. म्हणजेच आपले एस्. एम्. जोशी !

**– संग्रहातून**

इतिहास शिकणे सोपे असते; पण तो तयार करणे अवघड असते. तुमचा स्वतःचा 'इतिहास' तयार करा आणि इतरांनी त्याचा कित्ता गिरवावा, असे काम करून दाखवा.

# आर्य धर्माचा प्रसार - काल आणि आज

*आर्य धर्माचा प्रसार हा अतिशय गहन विषय आहे. श्री. नाडकर्णी यांनी या लेखात या विषयाचे अवगाहन केले आहे - संपादक*

उत्तरेस हिमालय आणि दक्षिणेस समुद्र अशा या द्वीपकल्पामध्ये हिमालयाच्या आसमंतात हजारो वर्षापूर्वी वास्तव्य करून असणाऱ्या आर्यवंशीय समाजाकडे अनेक ऋषी मुनींच्या माध्यमातून जो धर्म सोपवला गेला त्यास सनातन धर्म अथवा आर्य धर्म असं म्हटलं गेलं. कालांतराने सिंधू नदीच्या पलीकडे वास्तव्य करणारे ते 'हिंदू' लोक असे म्हटले गेल्याने या देशास हिंदुस्तान असे नाव मिळाले आणि आर्य धर्म हा हिंदुधर्म म्हणून ओळखला जाऊ लागला.

या धर्माची निर्मिती एखाद्याच द्रष्ट्याच्या स्फुरणातून झालेली नाही अथवा एखादा उपासना पंथ म्हणून ती सीमितही नव्हती. तर शेकडे ऋषी मुनींना सातत्याने चालू असलेल्या साधनेतून मिळालेल्या अनुभूतीतून झालेली होती. ५ ते ६ हजार वर्षापूर्वी झालेली ही निर्मिती एका व्यापक भूमिकेवर ठामपणे उभी होती. बागेतील प्रत्येक फुलाचा रंग वेगळा असतो. आकार वेगळा असतो पण ते प्रत्येक फूल आपापल्या परीने फुलत असते. त्याप्रमाणे प्रत्येक माणसाचा पिंड वेगळा असतो. विचार वेगळा असतो. प्रवृत्ती वेगळी असते. आणि म्हणून त्याचा उत्क्रान्त होण्याचा मार्ग वेगवेगळा असू शकतो. ज्याची जशी श्रद्धा असेल, जशी प्रवृत्ती असेल त्याप्रमाणे त्याने परमेश्वराची उपासना करावी अशी या धर्माची मूलभूत विचारसरणी असल्यामुळेच प्रत्येक हिंदू धर्मीय माणूस सहिष्णू बनला. हिंदुधर्मीय राजांनी आपल्या धर्माचा प्रसार करण्यासाठी परधर्मीयांवर हल्ले केले नाहीत. त्यांना आमिष दाखवून अथवा जबरदस्ती करून आपल्या धर्मात आणण्याचा प्रयत्न केला नाही. त्यांची प्रार्थना स्थळे उध्वस्त केली नाहीत. जो काही प्रसार झाला तो आप खुशीने. या धर्माची व्यापकता पटल्याने. अशा पद्धतीने प्राचीन काळी जो प्रसार झाला आणि ज्याचे अजूनही काही अवशेष शिल्लक आहेत, त्यांतील काही ठळक उदाहरणांकडे एक नजर टाकू.

जवळ जवळ दोन हजार वर्षापूर्वी हिंदुधर्माचा प्रसार आणि स्वीकार झाला तो मुख्यतः ब्रह्मदेशमार्गे सयाम कंबोडिया आणि इंडोनेशिया म्हणजेच जावा, सुमात्रा वगैरे बेटांवर. त्यापैकी कंबोडियामध्ये टिकून राहिलेला भौतिक अवशेष आणि इंडोनेशियातील बाली बेटावर आजही टिकून असणारा हिंदूधर्म याविषयी आपण माहिती घेऊ.

**कंबोडिया –** कंबोडिया देशाचे पूर्वीचे नाव कंबोज. हे नाव त्या देशास त्यांचे आदिपुरुष कंबऋषी यांचेवरून पडले असे मानले जाते. इसवी सनाच्या पहिल्या शतकांत कौडिण्य नावाचा एक ब्राह्मण या देशात गेला आणि पुढे तेथील राणी ''विला लीफ'' हिच्याशी विवाह करुन कंबोडिअन समाजास सुसंस्कृत करण्याचे कार्य त्याने केले असे मानले जाते. पुढे या भागात हिंदूधर्मीय रण्मेर वंशीय राजांची सत्ता होती. सूर्यवर्मन्, यशोवर्मन इत्यादी पराक्रमी राजांनी इथे राज्य केलं. त्यांनी अनेक शिवमंदिरे, विष्णु मंदिरे बांधली. इ.स.च्या चौथ्या, पाचव्या शतकापासून जवळ जवळ ८०० वर्षे रण्मेरवंशीय राजांची सत्ता टिकून होती. त्यानंतर चवदाव्या शतकांत तेथे बौद्धधर्मीय राजांची सत्ता येऊन सारा देश बौद्धधर्मीय बनला. विशेष म्हणजे चवदाव्या शतकापर्यंत येथे संस्कृत ही राजभाषा होती.

जे लोक काहीच करीत नाहीत, त्यांच्या हातून चुका होत नाहीत.

साधारणपणे इ.स. ११५० च्या सुमारस बांधले गेलेले **'अंगकोर वाट'** हे भव्य दिव्य असे मंदिर आजही कंबोडियातील एक सर्वश्रेष्ठ असे प्रेक्षणीय स्थळ म्हणून मानले जाते. राजा सूर्यवर्मन् २ रा याने हे विष्णू मंदिर म्हणून बांधले होते.



**अंगकोर वाट मंदिर – कंबोडिया**

१४ व्या शतकात तेथे बौद्ध धर्माचा प्रभाव वाढल्यावर तेथे गौतम बुद्धांची मूर्ती ठेवून त्याचे बौद्ध मंदिरात रुपांतर झाले असले तरी मंदिरात केलेल्या कोरीव कामात हिंदुधर्मातील पौराणिक कथांची दृश्ये आढळतात. देव–दानवांनी केलेले समुद्र मंथनाचे दृश्यही खास आकर्षित करणारे आहे. मंदिराचा संपूर्ण परिसर हा ५०० एकरांचा आहे. एकूण ५ घुमट असलेल्या मंदिराचा मधला घुमट हा २१३ फूट उंच आहे. आणि याची एकूण रचना ही पौराणिक कथांतील मेरु पर्वताच्या संकल्पनेतून साकार करण्यात आली आहे. मंदिराच्या परिसराभोवती ६५० फूट रुंदीचा व १३ फूट खोल असणारा खंदक खणलेला आहे. त्याची लांबी ३ मैल भरते. 'अंगकार वाट' याचा अर्थ शहराचे मंदिर. अंगकोर हा नगर या शब्दाचा अपभ्रंश तर 'वाट' हा वाटिका या शब्दाचा अपभ्रंश. मंदिराची रचना ही काहीशी दक्षिण हिंदुस्थानातील मंदिराप्रमाणे आहे. अर्धमंडप, मंडप, अंतराळ आणि कळस अशी रचना असणाऱ्या ह्या भव्य मंदिराला आता जागतिक स्मारकाचा दर्जा मिळाला आहे.

**इंडोनेशियातील बाली बेट –** जावा, सुमात्रा वगैरे बेटांना आता आपण इंडोनेशिया म्हणतो. यातील 'जावा' म्हणजे रामायणातही ज्याचा उल्लेख आढळतो. ते 'यावद्वीप' असे मानले जाते. ६ व्या शतकापासून १३ व्या शतकापर्यंत यातील निरनिराळ्या बेटांवर श्रीविजय,शैलेन्द्र, मातरम् इत्यादी घराण्यांनी राज्ये केली. यांतील काही राजे बौद्ध धर्मीय होते तर काही हिंदु धर्मीय होते. या संपूर्ण समाजावर त्या काळात पडलेला भारतीय संस्कृतीचा, रामकथेचा प्रभाव आजही टिकून आहे. मुस्लीम धर्म स्वीकारलेल्या अनेक नेत्यांची नावेही मूळ हिंदू नावाचा अपभ्रंश होऊन झालेली दिसतात. तेराव्या शतकात हा प्रदेश जेव्हा मुस्लीम आक्रमणास बळी पडला तेव्हा तेथील शेवटचा हिंदू राजा मोजो पाहिर आपली मुले, अनेक गायक, शिल्पकार, चित्रकार यांना बरोबर घेऊन याच समूहातील बाली या बेटावर गेला.

बाली हे एक छोटसं बेट आहे. या बेटातील एकूण लोकसंख्या जेमतेम ४० लाख एवढी आहे. परंतु या ४० लाखांच्या लोकवस्तीत ३७ लाख हिंदुधर्मीय आहेत. इतर ३ लाखांत मुस्लीम, बौद्ध वगैरे इतर धर्मीय येतात. एवढ्याशा छोट्या बेटावर मंदिरे व थोर पुरुषांच्या समाध्या यांची संख्या २०००० आहे. त्यामुळे बाली बेटाला हजारो मंदिरांचे बेट म्हणतात किंवा काही लोक त्याचा उल्लेख "Island of the Gods" असाही करतात. भगवंताच्या वामनावतारांत त्याने बळीराजास सुतलात ढकलून दिले, ते सुतल म्हणजेच हे बाली बेट असे मानले जाते. येथील लोक मुख्यतः शैवपंथीय असून सूर्य विष्णू व देवी यांचीही पूजा करतात. पुजाविधी बराचसा आपल्यासारखाच असतो. त्यांचा मुख्य पुजारी ज्याला ते 'पेदान्दा' म्हणतात. जे मंत्र म्हणतो तेही बरेचसे मूळ संस्कृत मंत्रांचे अपभ्रंशित वाटतात.

''परमेश्वर सर्वत्र आहे. सर्व चराचरांत भरलेला आहे. जसा तो सर्वाभूती आहे तसाच तो सर्व वनस्पतीत आहे, निर्जीवात आहे'' असे हा समाज मानतो. मानवाने कर्तव्यदक्ष

असावे असे मानणारा हा समाज ही कर्तव्ये मुख्यतः परमेश्वराप्रती, इतर मानवाप्रती आणि निसर्गाप्रती आहेत असे मानतो. मानवाच्या धार्मिकतेचा आविष्कार हा त्याच्या संयमी वागण्यातून प्रतीत होतो असे मानणाऱ्या या मंडळींची वर्तणूक योग्यायोग्यतेचा विचार करणारी, सद्भिरुचिला धरून चालणारी असते. रामायणाप्रमाणेच महाभारताला आणि विशेषतः त्यातील भगवद्गीतेच्या संदेशाला मानणाऱ्या या समाजाने एका मोठ्या चौकात अर्जुनाचा भव्य पुतळा उभारला आहे.



**बाली बेटावरील अर्जुनाचा पुतळा**

दुष्टांचे निर्दालन करण्याठी क्षात्र धर्माचे पालन करण आणि निरपेक्ष बुद्धीने कर्म करणे हा संदेश देण्यासाठीच या भव्य प्रतीकाची योजना आहे.

हा समाज वर्षभर घरात व मंदिरात तसेच सार्वजनिक रीत्या अनेक सण साजरे करतो. पण त्यांचा मुख्य सण असतो नववर्ष साजरे करण्याचा. त्यांचे नववर्ष सुरू होतं वसंत ऋतूत. साधारणपणे आपल्या गुढी पाडव्याच्या सुमारास नववर्ष साजरं करण्याची त्यांची पद्धतही जगावेगळी आणि आध्यात्मिकतेवर आधारलेली आहे. या सणाची सुरुवात प्रत्यक्ष नववर्षदिनाच्या २ दिवस आधी सुरू होते. **पहिल्या दिवसास 'मेलास्ति' म्हणतात.** त्या दिवशी मोठ्या मिरवणुकांनी देवाच्या मूर्ती अथवा



**बाली बेटावरील मंदिर**

प्रतिमांना घेऊन समुद्र स्नानाचा विधी पार पडतो. **दुसऱ्या दिवसास भूतयज्ञ म्हणतात.** त्यादिवशी राक्षसांचे मोठमोठे पुतळे मिरवणुकीने नाचवत नेले जातात. व त्यांचे दहन केले जाते. जुन्या वर्षात निर्माण झालेली सर्व दुरिते नष्ट करावी आणि मग नववर्षास सामोरे जावे अशी या मागील संकल्पना.

यानंतर **तिसरा दिवस म्हणजेच नववर्षाचा पहिला दिवस. यास 'न्येपि' म्हणतात.** त्या दिवशी सारे व्यवहार बंद असतात. कोणीही घराच्याबाहेर पडत नाही. रस्त्यावर शुकशुकाट असतो. त्यादिवशी एअरपोर्ट सुद्धा बंद असतो. सर्व लोक आपापल्या घरात राहून मौन पाळतात. उपोषण करतात ध्यान धारणा करतात. नववर्षी सुख, समाधान व शांति प्राप्त होण्यासाठी परमेश्वराची प्रार्थना करतात. गायत्री मंत्राचा जप करतात. सध्याच्या जागतिकीकरणाच्या रेट्यातही आपला धर्म, आपली संस्कृती, आपल्या परंपरा याच निष्ठेने आणि प्राणपणाने पालन करून आपली जीवनमूल्ये टिकवून ठेवणारा असा हा वैशिष्ट्यपूर्ण समाज.

स्वप्नं ती नव्हेत जी झोपल्यावर पडतात, तर स्वप्नं ती असतात जी झोपूच देत नाही.

### देवी सरस्वती दिन–विज्ञान दिन

नवर्षाच्या खालोखाल बालीमध्ये देवी सरस्वती दिन मोठ्या उत्साहाने साजरा होते. देवी सरस्वती ही विद्येची कलेची, विज्ञानाची देवता. तिच्या आशीर्वादानेच आपण शास्त्र पारंगत होतो. अज्ञानाचा अंधःकार नाहीसा होतो आणि म्हणून हा दिवस मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. लहान मुले आणि विद्यार्थी तर सरस्वती पूजन करतातच पण या दिवसास विज्ञान दिनाची व्यापकता दिल्या गेल्यामुळे सर्वच स्तरांतून सरस्वतीपूजन केले जाते. आपल्याकडेही पूर्वी पाटीपूजन करण्याची पद्धत होती. मात्र आता ती हळू हळू लोप पावत चालली आहे.

याच पार्श्वभूमीवर आलीकडेच घडलेल्या एका वैशिष्ट्यपूर्ण घटनेचा उल्लेख करणे ही आवश्यक आहे. इंडोनेशियात मुस्लीम समाज बहुसंख्येने आहे. तिकडच्या सरकारातही त्यांचे प्राबल्य आहे. तरीपण जसे रामकथेला महत्व दिले जाते तसेच सरस्वतीच्या भव्य दिव्य अशा प्रतीकालाही मान्यता दिली आहे आणि म्हणून अमेरिकेतील त्यांच्या वकिलाती समोरील प्रांगणात देवी सरस्वतीच्या भव्य मूर्तीची स्थापना करण्यात आली. त्यासाठी अमेरिकन सरकारची खास परवानगी घेण्यात आली. बाली बेटावरुन मूर्तीकाराना अमेरिकेत नेऊन ती मूर्ती घडविली गेली.



**अमेरिकेत स्थापन केलेला सरस्वतीचा पुतळा**

बाली बेटावरील हिंदू धर्मीयांच्या अशा अनेक कथा आहेत. अनेक परंपरा आहेत. परंतु त्यांतील काही मोजक्याच इथे मांडल्या.

प्राचीन काळी आर्यधर्माचा प्रसार कोणत्या भागात झाला आणि आज त्याचे अवशेष कुठे आणि किती प्रमाणांत शिल्लक आहेत ते आपण पाहिले. मध्ययुगीन काळातील बहुतांश काळ हा परकीय आक्रमणांना तोंड देण्यात गेला. समाजाचा एक घटक या संघर्षात गुंतला होता आणि दुसरा घटक तमोगुणाच्या छायेत दिवस ढकलत होता. १६ व्या शतकापासून पाश्चिमात्यांचा ओघ या देशात सुरू झाला. त्यांच्यातील जिज्ञासूंना या देशातील धर्माच्या व्यापक स्वरूपाचे आकलन होऊ शकले नाही. काही बाह्य आचार–विचार, रूढी, संकलपना हाच यांचा धर्म अशी त्याची गैरसमजूत झाली. पाश्चिमात्यांचा झालेला हा गैरसमज दूर करून आर्य धर्माचे भव्य दिव्य आणि व्यापक असे स्वरूप त्यांना दाखवण्याचे कार्य १८९३ साली स्वामी विवेकानंदानी शिकागो येथील सर्वधर्म परिषदेपासून सुरू केले. अमेरिकेच्या सुपीक भूमीत स्वामीजीनी पेरलेल्या या वैचारिक बीजाला खतपाणी घालून त्याचा वृक्ष करण्याचे कार्य पुढे परमहंस योगानंदजी, स्वामी राम, स्वामी चिन्मयानंदजी इतयादी अनेक थोर विभूतींनी चालू ठेवले. आज १०० वर्षांनी आपणास असे दिसते की अनेक गौरवर्णीय अमेरिकनांनी हिंदु धर्माचा स्वीकार केला आहे. स्टिफन नॅप, डेव्हिड फ्रावले, डॉ. फ्रँक मोरॅलिस यांच्यासारखे अनेक गौरवर्णीय हिंदुधर्माचा केवळ स्वीकार करून थांबले नाहीत तर हिरिरिने प्रसार करत आहेत. डॉ. फ्रॅन्क मोरॅलिस हे तर आता अमेरिकेतील एका राज्यातील हिंदु मंदिराचे प्रमुख पुजारी झाले आहेत. अमेरिकेत आता निरनिराळ्या राज्यांत शेकडो हिंदू मंदिरे उभारली गेली आहेत. जवळ जवळ प्रत्येक शहरांत योगाचे क्लासेस चालू आहेत. असे अनेक गौरवर्णीय आहेत की ज्यांनी हिंदुधर्माचा स्वीकार केला नसला तरी पुनर्जन्माची

संकल्पना आणि कर्माचा सिद्धांत इत्यादी हिंदुधर्मातील विचारांवर त्यांचा विश्वास बसला आहे. अमेरिकेसारख्या देशांत स्थायिक झालेल्या भारतीयांची संख्याही फार मोठी आहे. त्याचाही थोडा फार परिणाम होणे शक्य असते. परंतु फारसे भारतीय नसलेल्या आफ्रिकेतील घाना या देशात तेथील रहिवाशांनी हिंदुधर्माच्या तत्त्वांचा स्वीकार करून जे मंदिर उभारले आहे, जी संस्था चालविली आहे त्याबद्दल आता आपण माहिती घेऊ.

**घानात सुरु झालेला प्रसार**

उंच घुमट असणारं एक सुंदर मंदिर. प्रवेशद्वाराच्या वर असणार आणि दूरुनही दिसणारे ओंकाराचे प्रतीक. आत प्रवेश केल्यावर दिसणाऱ्या झगमगीत प्रावरणातील हिंदू देवतांच्या सुंदर मूर्ती आणि त्यासमोर मांडी घालून बसलेला आणि भजन करण्यात तल्लीन झालेला ५०/६० भक्तांचा समुदाय. भारतामध्ये आपण कुठेही गेलो तरी अशा प्रकारचं दृश्य दिसू शकत. त्यात आश्चर्य ही वाटणार नाही. पण या ठिकाणी मात्र कोणाही भारतीयाला आश्चर्य वाटेल. कारण हे दृश्य आहे आफ्रिकेतील घाना या देशातलं. हे भक्त भारतीय नाहीत तर कृष्णवर्णीय आफ्रिकन आहेत ते कधीही भारतात गेलेले नाहीत. तरीही या मंदिरात रोज सायंकाळी येऊन भक्तिभावाने भजन करतात.



**स्वामी घानानंद सरस्वती**

स्वामी घानानंद सरस्वती हे या मंडळींचे गुरू. त्यांनीच या मंदराची स्थापना १९७५ साली केली. स्वामी घानानंदाना लहानपणापासून अध्यात्माची ओढ होती. त्यांच्या आईने त्यांना ख्रिस्ती धर्माची दीक्षा दिली होती. पण त्यांचे समाधान होत नव्हते. अशावेळी भारतीय तत्त्वज्ञानाचे पुस्तक त्यांच्या वाचनात आले. त्यानंतर मात्र ते तडक भारतात आले आणि ऋषिकेश येथील एका आश्रमात दाखल झाले. योगसाधना करत असतानाच त्यानी प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानाचा, गंथांचा अभ्यास केला. त्यांच्या गुरुंनी त्यांना घानानंद सरस्वती हे नाव बहाल केल आणि आफ्रिकेत जाऊन हिंदुधर्माचा त्यांतील तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्याचा आदेश दिला. त्यानुसार घानानंदांनी १९७५ साली या मंदिराची स्थापना केली. या मंदिराची स्थाना होताच त्यांना फार मोठा विरोध झाला. पण त्यांनी स्पष्टपणे जाहीर केलं की हिंदू धर्माच्या विचारधारेला अनुसरून कोणावरही हा धर्म स्वीकारण्याची जबरदस्ती होणार नाही. ज्यांना रुचेल त्यांनीच येथे यावे. आज मितीस जवळ जवळ २००० कृष्णवर्णीय या मंदिरात येतात. त्यापैकी अनेकजण आपण हिंदुधर्माचा स्वीकार केल्याचे सांगतात. घानानंद रोज सायंकाळी जमलेल्या मंडळींना त्यांच्या भाषेत हिंदुधर्माचे तत्त्वज्ञान समजावून सांगतात.

घानानंदांचा अधिकार - १९८२ साली प्रसिद्ध झालेले 'सत्संग वॉल्युम २' हे पुस्तक माझ्या वाचनात आलं. योगी श्री अरविंदांच्या विचारांचे भाष्यकार कै. माधव पंडीत यांची व्याख्यान, प्रश्नोत्तरे आणि काही पुस्ताकांवरील त्यांचे अभिप्राय असं या पुस्तकाच स्वरूप. या पुस्तकात रामकृष्ण वेदांत सेंटर लंडन यांनी प्रसिद्ध केलेल्या 'मेडिटेशन' या पुस्तकाचा उल्लेख आहे. त्यावर आपले मत नोंदवताना कै. पंडीत म्हणतात-

"Swami Ghananand's chapter on 'Mantra Sadhana' is simple & yet profound. He

assimilates ancient wisdom with the modern development in science and relates the practise to the general evolution of conciousness- The subtle nature of the "Lotuses, function fo the 'nadis', role of breath & the sense in which sound is percursor of form - all these points are explained with a rare clarity." यावरून स्वामी घानानंदांनी केलेली प्रगती आणि त्यांचा अधिकार आपणास समजू शकतो. अशा रीतीने हिंदू धर्माच्या विचारांचा प्रसार आफ्रिका खंडातही पोहोचला आहे. आपणास जरी समजले नाही, तरी सत्यज्ञानाचा प्रसार करण्याचे नियतिचे कार्य चालूच असते.

**श्री. नरेन्द्र नाडकर्णी**
सीडी. १०१, सी. १,
श्रीरंग सोसायटी, ठाणे.
दूरध्वनी - २५३३३१६०
E mail : nd_nadkarni@yahoo.com

●●●

क्रांतिकारक क्षण ! निमित्त-ऑगस्टचे

**माळ्याचा उपदेश!**

एका पेरूच्या बागेत, इतर मुलांबरोबर पेरू तोडायला 'नन्हे' ही गेला. पण माळी आल्यानंतर बाकीची मुले पळाली. नन्हे मात्र त्याच्या हाती सापडला. माळ्याने नन्हेला खूप मारले, तेव्हा तो रडत म्हणाला, ''माळीबुवा, मला मारु नका. मला वडील नाहीत. मी गरीब आहे!'' माळ्याला दया आली. त्याने नन्हेला सोडताना सांगितले, ''पोरा, तुला वडील नाहीत, तू गरीब आहेस म्हणून तर तुला इतरांपेक्षा जास्त चांगल्या रीतीने, जबाबदारीने वागायला हवं!'' नन्हे पं. नेहरूंच्या नंतर भारताचा पंतप्रधान झाला. हा नन्हे म्हणजेच आपले लाल बहादूर शास्त्री !

**- संग्रहातून**

## *मेंदूचा विकास व दुरुस्ती यु.के. व भारत यांचे संयुक्त प्रयत्न*

बंगलुरू येथील काही संस्थांनी युके मधील एडिनबर्ग विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने संशोधन करण्यात पुढाकार घेतला आहे. दोन वर्षाच्या संयुक्त विद्यमाने एकत्रित केलेल्या संशोधकांवर नॅशनल सेंटर फॉर बायोलॉजिकल सायन्सेस व स्टेम सेल बॉयोलॉजी अँड रीजनेरटीव्ह मेडिसीन (इन स्टेम) या दोन संस्थांनी एकत्रितपणे सेंटर फॉर ब्रेन डेव्हलपमेंट अँड रिपेअर (सीबीडीआर) ची स्थापना केली. १६ फेब्रुवारी २०१३ रोजी या संस्थेचे औपचारिक उद्‌घाटन झाले.

अशा प्रकारचे केंद्र (सेंटर) स्थापन करण्याच्या दृष्टीने अनेक परिषदा, चर्चा सत्रे होऊन दोन्ही देशांतील मज्जातंतू शास्त्रज्ञांना असे अद्ययावत व्यासपीठ असावे याची गरज जाणवली. पारंपरिक व्यासपीठापेक्षा अनेक नवीन सोयी येथे असल्याची माहिती मज्जातंतु शास्त्राचे प्राध्यापक व एनसीबीएस चे संचालक सुमंत्र चटर्जी यांनी दिली.

संदर्भ : करंट सायन्य, २५ मार्च २०१३
खंड १.४/६, पृ. ६९२.

●●●

# कौटुंबिक कलह टाळता येऊ शकतो

*कायद्याची सर्व सामान्यांना माहिती असणे आवश्यक आहे. सदर लेखात घटस्फोटासंदर्भात असणाऱ्या कायद्याची त्रोटक माहिती आहे - संपादक*

भारतातील वाढत्या घटस्फोटाच्या दाव्याने एकंदरीत भारतीय जनाला आणि मनाला गोंधळून टाकले आहे. घटस्फोटाला किंवा वाढत्या वैवाहिक तंट्याला अनेक घटक, कारणे आहेत. त्याची चर्चा इथे नको, परंतु शक्य असलेले तंटे, कारणे, गैरसमज हे आपसात मिटविणे ही त्या दाम्पत्याचीच नव्हे तर एकूण समाजाची गरज आहे. समाज हे कुटुंबाचेच प्रगत झालेले रूप आहे. त्यामुळे समाज टिकविण्यासाठी कुटुंब टिकविणे फार गरजेचे आहे.

भारतीय न्याय व्यवस्था त्यामुळेच वाढणाऱ्या वैवाहिक तंट्यामुळे चिंताग्रस्त दिसून येत आहे. जे वाद आपआपसांत, तडजोडीने किंवा कुटुंबातील ज्येष्ठ सदस्यांच्या माध्यमातून सोडविता येऊ शकतात, ते त्यांनी सोडवावे, अशी अपेक्षा आज भारतीय न्याय व्यवस्था करताना दिसून येत आहे.

भारतीय सर्वोच्च न्यायालयाने फेब्रुवारी २०१३ मध्ये के. श्रीनिवास राव विरुद्ध डि. ए. दिपा ((२०१३) ५ एम. सी. सी. २२६ ३ या अपील याचिकेमध्ये अशाच प्रकारचे दिशा निर्देशन दिले आहे. लग्नाच्या दुसऱ्याच दिवशी एका छोट्याशा कारणामुळे वधु आणि वराच्या मंडळीमध्ये वाद झाला त्यामुळे नवीन नवरी सासरी न जाता मोहेरी निघून गेली. सहा महिन्यानंतर तिने नवरा व सासरच्या मंडळीविरुद्ध महिला तक्रार निवारण केंद्राकडे तक्रार केली. कौटुंबिक न्यायलयामध्ये दाम्पत्य अधिकाराच्या प्रत्यास्थापणा (Restitution of Conjugal Rights) साठी अर्ज केला. न्याय दंडाधिकाऱ्याकडे कलम ४९८-अ, भारतीय दंड संहितेचा तक्रार अर्ज दिला. नवऱ्याने देखील बायकोने मानसिक त्रास दिला, त्याच्या कार्यालयात पत्रे पाठवून त्याला नोकरीहून काढून टाकावे अशा प्रकारचा त्रास दिला म्हणून बायकोविरुद्ध घटस्फोटाचा दावा दाखल केला. अनेक ठिकाणी एकमेकांविरुद्ध केलेला तक्रारीचा निर्णय कधी इकडे कधी तिकडे करीत शेवटी एकदाचा सर्वोच्च न्यायलयापर्यंत पोहचला.

या अपीलाची ही सर्व वस्तुस्थिती सांगण्यामागे कारण एवढेच आहे की, वाचकांनी भांडणाचे मूळ कारण शोधून काढावे किंवा ते टाळता आले असते का याचा विचार करावा. सर्वोच्च न्यायालय देखील या निर्णयामध्ये आश्चर्य व्यक्त करीत हा वाद टाळता आला नसता का अशी विचारणा करीत आहे. ते पुढे असे ही म्हणतात की, वैवाहिक तंट्यांमध्ये फक्त एकाचीच चुकी असते असे म्हणता येणार नाही, परंतु जेव्हा वाद होण्याच्या मार्गावर असतो किंवा झालेला असतो अशावेळी अशक्य नसेल तर पोलीस आणि न्यायालयाकडे जाण्यापूर्वी घरातील जेष्ठ मंडळीनी समुपदेशन, मध्यस्थी करुन असे वाद मिटविण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे झाले तर अनेक कुटुंबे वादातीत जीवन जगण्यापासून स्वतःला सावरु शकतील. वाद झालेल्या जोडप्यांची मानसिक स्थिती समजून घेवून सर्वोच्च न्यायालय पुढे असे ही म्हणते की, लहान-मोठे वाद झाल्यानंतर जोडीदार शांतपणे विचार करण्याच्या मनःस्थितीत नसतो. बऱ्याचदा चुकीच्या मार्गदर्शनामुळे देखील घरातील साधा वाद चव्हाट्यावर आणून मोठा केला जातो व त्यातून पुढील सगळे रामायण घडते. म्हणून योग्य मध्यस्थी, समुपदेशन आणि चांगले मार्गदर्शन असणे फार आवश्यक असते.

सर्व प्रकारच्या कार्यांची सुरुवात ही अर्थ म्हणजेच संपत्तीपासून होते. - कौटिल्य

गैरसमजातून, चुकीच्या मार्गदर्शनातून उदभवलेले वाद हे मध्यस्थ आणि समुपदेशनाच्या माध्यमातून सोडविता येवू शकतात असे न्यायलयास वाटते आणि म्हणूनच मध्यस्थ आणि वैकल्पिक कलह निवारण या पद्धतीला आता न्यायलयाने कायद्याचे स्वरुप प्राप्त करुन दिले आहे. या अपीलामध्ये सर्वोच्च न्यायलयाने देशातील सर्वच कौटुंबिक न्यायलये व इतर न्यायलयांना असे निर्देश दिले आहेत की त्यांनी कौटुंबिक कलहातून निर्माण होणाऱ्या कुठल्याही दाव्याचा किंवा तक्रारीच्या सुरुवातीलाच वादकरी जोडप्याला प्रशिक्षित मध्यस्थ व समुपदेशकाकडे पाठवावे व त्यांच्यामध्ये तडजोड होईल यासाठी शक्य तो प्रयत्न करावा.

कौटुंबिक कलह हा दिवाणी व फौजदारी अशा दोन्ही स्वरुपाचा असतो. दिवाणी कौटुंबिक कलह उदा. दाम्पत्य अधिकाराचे प्रत्यास्थापण, घटस्फोट, मुलांचा ताबा इ. मध्यस्थ, समुपदेशकाच्यामाध्यमातून सोडविता येऊ शकतो. परंतु फौजदारी स्वरुपाचे कौटुंबिक कलह/गुन्हे उदा. कलम ४९८ अ, भारतीय दंड संहितेखाली नोंदविलेला गुन्हा मध्यस्थ किंवा अन्य कुठल्याही मार्गाने तडजोड करता येत नसल्यामुळे वादकरी जोडप्याला जरी पुन्हा (प्रामाणिकपणे) एकत्र नांदावयाची इच्छा झाल्यास हे कलम व त्याचा कायदा त्यामध्ये अडथळे निर्माण करत आहे, असे सर्वोच्च न्यायलयाच्या लक्षात आल्यामुळेच सर्वोच्च न्यायलयाने रामगोपाल विरुद्ध मध्यप्रदेश राज्य ((२०१०)१३ एम.सी.सी. ५४०) या केसमध्ये भारत सरकार व भारतीय विधी आयोग यांना कलम ४९८-अ करण्याची विनंती केली होती, परंतु त्यावर अजून पर्यंत सकारात्मक प्रतिसाद न आल्यामुळे सर्वोच्च न्यायलयाने के. श्रीनिवासच्या अपीलामध्ये असा निर्णय दिला की, जर वादकरी जोडपे एकत्र नांदावयास तयार असतील तर कलम ४९८-अ ची तक्रार उच्च न्यायलय सर्व गोष्टीची शहानिशा करून ती रद्द करू शकते. कलम ४८२ फौजदारी प्रक्रिया संहिता तसा अधिकार उच्च न्यायलयास प्रदान करते.

सदर अपीलामध्ये मा. सर्वोच्च न्यायलयाने इतर अनेक विषयावर चर्चा केली आहे. परंतु ती चर्चा त्या दोन व्यक्तीनी एकमेकांवर केलेल्या आरोप-प्रत्यारोपांची व त्याच्या कायदेशीर सत्यतेची असल्याने इथे ती प्रासंगिक नाही. समाजाचे अस्तित्व हे कुटुंबावर तर कुटुंबाचे अस्तित्व हे त्याच्या सभासदाच्या वागण्यावर, समजुतदारपणावर अवलंबून असते. या कुटुंबातील दोन सदस्य नवरा-बायको हे जर सामंज्यसाने वागत असतील तर एक चांगले कुटुंब तयार होते व अशी अनेक कुटुंबे जेव्हा एकत्र येतात तेव्हा एक चांगला समाज तयार होतो.

**प्रा. विनोद एच. वाघ**
व्ही. पी. एम्स. हि. एम.सी.
विधी महाविद्यालय, ठाणे

●●●

## *रॉयल एशियाटिक सोसायटी*

द रॉयल ओशियाटिक सोसायटीची स्थापना १५ मार्च १८२३ रोजी झाली. तिच्या स्थापने मागे आशियाशी संबंधित विज्ञान, साहित्य व कला यांना प्रोत्साहन देणे व या संदर्भात संशोधन करणे हा हेतू होता. तिच्या स्थापनेपासून प्रगाढ ज्ञान व विद्वत्ता यासाठी ती कार्यरत आहे. १८२९ पासून आशियाई साहित्यातील महत्त्वाची प्रकाशने करणे व १८३१ पासून संशोधन पत्रिका चालवणे हे काम चालू आहे.

२० व्या शतकाच्या मध्यापासून विद्यापीठांच्या विभागांमध्ये जसा या अभ्यासाचा विस्तार वाढत गेला. तशी सोसायटीचीही केंद्र म्हणून वाढ झाली; की ज्यात विद्यापीठातील व्यावसायिक अभ्यासात, वस्तुसंग्रहालये व ग्रंथालयातले अभ्यासक स्वतंत्रपणे सोसायटीशी संलग्न होऊ लागले.

रॉयल एशियाटिक सोसायटी ऑफ
ग्रेट ब्रिटन व आयर्लंड
या माहिती पुस्तिकेवरून
**- संकलित**

वेग हे घोड्याचे भूषण आहे, तर डौलदार चाल हे हत्तीचे, चतुराई स्त्रियांचे भूषण आहे,
तर सतत उद्योगात राहणे पुरुषाचे भूषण आहे.

# परिसर वार्ता

**– संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, पूर्व प्राथमिक विभाग

**डॉ. बेडेकर विद्यामंदिर प्राथमिक विभाग इ. ३ री एम्. टी. एस्. परीक्षेतील शिष्यवृत्ती प्राप्त विजेते विद्यार्थी**

जानेवारी २०१३ मध्ये घेण्यात आलेल्या इ. ३ रीच्या एम्. टी. एस्. परीक्षेत शिष्यवृत्ती प्राप्त झालेले विद्यार्थी खालीलप्रमाणे :-

१. ओमकार जयवंत सावंत ठाणे केंद्रात १ ला
२. जान्हवी प्रशांत महाडिक –''– २ री
३. अमृता महेंद्र कलढोण –''– ३ री
४. श्रुतिक राजेश पर्शराम –''– ४ थी
५. मयुर ज्ञानदेव शेलार –''– ५ वा
६. अैनिश कल्पक मोकाशी –''– ६ वा

**इ. ४ थी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती प्राप्त विजेते विद्यार्थी**

मार्च २०१३ मध्ये घेण्यात आलेल्या इ. ४थी च्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी खालीलप्रमाणे –

१. समर्थ मनिष चौधरी –जिल्ह्यात २३ वा
२. सेजल श्रीकांत रांगळे – –''– ३१ वी
३. ऋग्वेद रामचंद्र बिरंजे – –''– ३२ वा.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

**शालांत परीक्षा निकाल**

शालांत परीक्षा मार्च २०१३ च्या विषयात सर्वप्रथम विद्यार्थी खालीलप्रमाणे आहेतः-

| क्र. | विषय | गुण | विद्यार्थ्याचे नाव |
|---|---|---|---|
| १. | मराठी | ९३ | पाटील अक्षया जयंत |
| २. | हिंदी | ८८ | देशमुख चैताली प्रदिप |
| ३. | संस्कृत | १०० | काळभोर प्रणिता हनुमंत |
| ४. | इंग्रजी | ९४ | काळभोर प्रणिता हनुमंत |
| | | ९४ | पांचाळ अंकुश राजेंद्र |
| | | ९४ | बोरवणकर नेहा श्रीकांत |
| ५. | गणित | १४६ | पिळणकर प्रणव प्रविण |
| ६. | विज्ञान | ९९ | काळभोर प्रणिता हनुमंत |
| ७. | स.शास्त्र | ९८ | भोईर दर्शना जयवंत |

**इ. ५ वी च्या विद्यार्थ्यांचे स्वागत –**

दि. २०/६/२०१३ रोजी इ. ५ वीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत मा. मुख्याध्यापक श्री. गवई यांनी केले. या प्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना अभ्यास शालेय शिस्त वगैरे संबंधी मार्गदर्शन केले. इ. ५ वीच्या सर्व विद्यार्थ्यांना चॉकलेटस वाटण्यात आली.

**इ. १० च्या विद्यार्थ्यांसाठी**

प्रकाश रननवरे यांनी दि. १८/६/२०१३ रोजी 'शिक्षण स्फूर्ती व्याख्यानमाला' यांचे (सी.डी. द्वारे) विद्यार्थ्यांना अभ्यासात अभिरुची वाढवण्यासाठी व १० वीच्या अभ्यासात 'स्व' प्रगती कशी साधता येईल याबाबत मार्गदर्शन केले.

**ब्राह्मण सेवा संघ, ठाणे** – शिक्षण सहाय्यक समिती तर्फे, एप्रिल २०१३ मध्ये घेण्यात आलेल्या 'संस्कृत

शिष्यवृत्ती' परीक्षेत आपल्या शाळेतील खालील दोन विद्यार्थीनींना संस्कृत शिष्यवृत्ती मिळालेली आहे.

१. कु. काबाडी ऋजुता नयन (गुणानुक्रमे दुसरी)

२. कु. दिघे रोशनी संजय (गुणानुक्रमे पाचवी)

**माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल**

मार्च २०१३ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत आपल्या शाळेचा निकाल ८०% लागला असून ७ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली.

१. कौस्तुभ भुरे २. वेदांत कोंडे ३. शुभम अवघडे

४. ऋषिकेश जाधव ५. पायल शेडगे

६. श्रुती रावराणे ७. वेदश्री वडशिंगकर

मार्गदर्शक शिक्षक – सौ. उज्ज्वला धोत्रे, सौ. सायली माने, श्री. शेलवले.

**राजर्षी शाहू महाराज जन्मदिन**

दि. २६/६/२०१३ रोजी राजर्षी शाहू महाराज यांच्या जन्मदिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी त्यांचे व्यक्तिमत्त्व व कार्य आपल्या भाषणात सादर केले. मा. मुख्याध्यापक श्री. गवई सर, श्री. गावीत, श्री. धोंडे यांनी शाहू महाराजांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचा आढावा घेऊन विद्यार्थ्यांना प्रेरित केले.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

इंग्रजी कालगणनेनुसार जानेवारी महिन्यापासून नवीन वर्षाची सुरुवात होते. पण शैक्षणिक वर्षाची सुरुवात मात्र जून महिन्यापासून होते. पाऊस आणि शाळा एकदमच सुरू होतात.

यावर्षी शनिवार १५ जून २०१३ रोजी ज्यूनियर के.जी. मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांची 'परिचयात्मक सभा' (Introductory meeting) घेतली गेली. सौ. ए. के. जोशी शाळेच्या 'गार्गी' सभागृहात या सभेचे आयोजन केले होते.

पूर्व प्राथमिक विभागाच्या प्रमुख सौ. मेघना मुळगुंद यांनी ह्या सभेला संबोधित केले. विद्या प्रसारक मंडळ व त्यातील विविध संस्थांचा परिचय त्यांनी पालकांना करून दिला. पालकांचे ए. के. जोशी परिवारात सामील झाल्याबद्दल हार्दिक स्वागत व अभिनंदन केले.

पूर्व प्राथमिक विभागात होणारे उपक्रम साजरे होणारे सण आणि शाळेच्या नियमांची सौ. मेघना मुळगुंद यांनी पालकांना माहिती दिली. या विभागाच्या शिक्षकांची व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पालकांशी ओळख करून देण्यात आली. सर्व पालकांचे वसंत पेय (पन्हे) देऊन स्वागत केले गेले. यानंतर पालकांनी पूर्व प्राथमिक विभागाचे निरीक्षण करुन शिक्षकांची भेट घेतली.

यानंतरच्या शनिवारी म्हणजे २२ जून २०१३ रोजी पूर्व प्राथमिक विभागात ज्यूनियर के.जी.च्या पालकांसाठी गणित (Maths) व परिसर अभ्यास विषयांवरील कार्यशाळेचे आयोजन केले गेले. सर्व शिक्षकांनी आपापल्या वर्गातून पालकांना या विषयांचे मार्गदर्शन केले.

२९ जून २०१३ ला भाषा विषयाच्या मार्गदर्शनासाठी पालकांना शाळेत निमंत्रित केले होते. भाषा विषय कसा शिकवला जातो, याबद्दलची माहिती पालकांना देण्यात आली.

या दोन्ही कार्यशाळांत त्या विषयांसाठी वापरली जाणारी शैक्षणिक साधने पालकांना दाखवली गेली. दोन्ही कार्यशाळांदरम्यान पालकांसाठी चहापानाची सोय शाळेतर्फे केली गेली होती. पालकांनी त्यांच्या शंका विचारल्या व शिक्षकांनी त्यांचे निरसन केले. या दोन्ही कार्यशाळांना पालकांनी चांगला प्रतिसाद दिला.

---

'सुदृढ लोकशाहीसाठी एका शिस्तबद्ध समाजव्यवस्थेची गरज असते आणि त्यासाठी नागरिक म्हणून आपलं वर्तन अधिक सन्माननीय, सहनशील आणि आदरणीय असायला हवं' – चार्ल्स पिकरिंग

अशा प्रकारे या वर्षीच्या उपक्रमांचा पहिला टप्पा यशस्वीपणे पार पडला.

पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती निकाल

फेब्रुवारी २०१३ च्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत सौ. ए. के. जोशी प्राथमिक विभागातील एकूण ८८ विद्यार्थी बसले होते. त्यांतील २२ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली. शाळेचा निकाल ९०.९१% लागला. खालील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली.

| विद्यार्थ्यांची नावे | शिष्यवृत्ती क्रमांक |
|---|---|
| १. कु. वरद उमेश लेले | दहावा |
| २. कु. अन्वय सुजीत नेरुरकर | तेरावा |
| ३. कु. चैताली शिरीष माजरेकर | पंधरावा |
| ४. कु. केतकी मारुती धर्माधिकारी | सोळावा |
| ५. कु. ईशान राजेश मलिये | सोळावा |
| ६. कु. अभिराज प्रशांत कुलकर्णी | सतरावा |
| ७. कु. ओंकार समीर राऊत | एकोणीसावा |
| ८. कु. निधी विजय सुर्वे | बावीसावा |
| ९. कु. जान्हवी सिद्धेश्वर नातू | तेवीसावा |
| १०. कु. शुभम प्रमोद करमपुरे | चोवीसावा |
| ११. कु. सोनाली योगेंद्र आगाशे | पंचवीसावा |
| १२. कु. आशुतोष धनंजय साठे | सव्वीसावा |
| १४. कु. सुरभि प्रशांत लेले | सव्वीसावा |
| १५. कु. आदित्य सचिन सामंत | अठ्ठावीसावा |
| १६. कु. अजिंक्य मकरंद जोशी | अठ्ठावीसावा |
| १७. कु. केदार महेश हर्डिकर | एकोणतीसावा |
| १८. कु. ओंकार वैभव पाटील | एकोणतीसावा |
| १९. कु. सर्वेश संदीप शिंदे | एकोणतीसावा |
| २०. कु. अनु लोटान पाटील | तिसावा |
| २१. कु. वेदांती गजेंद्र हिंदुराव | तिसावा |
| २२. कु. मैत्री देवेंद्र मोभारकर | एकतिसावा |

**मार्च २०१३ – माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकालः**

परीक्षेला बसलेले विद्यार्थी – ७८
उत्तीर्ण विद्यार्थी – ७३

शहरी विभागातील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची नावे आणि क्रमांक खालीलप्रमाणे :–

| क्र. | नाव | क्रमांक |
|---|---|---|
| १. | श्रीदिप क्षीरसागर | ३ |
| २. | शांभवी जोशी | ५ |
| ३. | गायत्री मुकादम | ८ |
| ४. | आदित्य दातार | १० |
| ५. | प्रज्ञा घारपूरे | १३ |
| ६. | सानिका गोरे | १३ |
| ७. | रिद्धी खोले | १४ |
| ८. | वरदा अवचट | १७ |
| ९. | अथर्व जोशी | १९ |
| १०. | ओंकार वरुडकर | १९ |
| ११. | श्रेया कुलकर्णी | २३ |
| १२. | प्रणव पाठक | २४ |
| १३ | मोहित मुसळे | २६ |
| १४. | मिहिर देसाई | २७ |
| १५. | यशदा जोशी | २८ |
| १६. | शिवानी निफाडकर | २८ |

यशस्वी होणं याचा अर्थ कधीही अपयश न मिळणं असा नसून अंतिम ध्येय गाठणं असा आहे. – एडविन सी. ब्लिस

| | | |
|---|---|---|
| १७. | साक्षी भट | ३० |
| १८. | स्नेहा बर्वे | ३१ |
| १९. | अर्णव गद्रे | ३१ |
| २०. | अवनी इनामदार | ३१ |
| २१. | जिनय गाडा | ३३ |
| २२. | तन्मय गिरी | ३३ |
| २३. | म्रिणालिनी देवघरे | ३४ |

**संस्कृत शिष्यवृत्ती परीक्षा २०१२-१३ चा निकाल**

१००% निकाल : परीक्षेला बसलेले विद्यार्थी -४३

ब्राह्मण सेवा संघ आयोजित संस्कृत शिष्यवृत्ती परीक्षेतील शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी :

१. चैत्राली जोशी - तिसरा क्रमांक

२. तनया पोवळे - पाचवा क्रमांक

३. गायत्री पाटील - पाचवा क्रमांक

४. अदिती गोरे - पाचवा क्रमांक

५. श्रुती साठे - सहावा क्रमांक

## जोशी बेडेकर महाविद्यालय

दिनांक १४-१५ जून रोजी विद्या प्रसारक मंडळाचे Dr. V. M. BRIMS (Managment Development conference for VPM's Group of Institutions Heads of Institutions Departments) येथे सर्व विभाग प्रमुखांची इतर मान्यवरांसोबत द्विदिवसीय कार्यशाळेचे 'Rising Aabove and Beyond Excellence' या विषयांतर्गत आयोजन करण्यात आले होते.

१४ जून २०१३ रोजी विविध मान्यवर विचारवंतांचे अनेकविध विषयांवर बौद्धिक सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

- Academic Excellence, Ramkrishna Bajaj award in Education यावर डॉ. विष्णू कान्हेरे यांनी सर्वांना उत्कृष्ट मार्गदर्शन केले.
- Models of Excellence in Education यावर डॉ. गुरुप्रसाद मूर्ती यांचे मार्गदर्शन लाभले.
- Teaching Learning process या विषयावर डॉ. गुरुप्रसाद मूर्ती आणि विज्ञान, कला, वाणिज्य विभागांच्या मान्यवर प्राध्यापकांनी आपले विचार मांडले.
- Creativity and Innovation in Education या विषयांतर्गत डॉ. एस. आगरकर, डॉ. पी. एम. केळकर तसेच मुख्य अतिथी डॉ. पार्वती वेंकटेश (प्राचार्या मुलुंड वाणिज्य महाविद्यालय) यासर्वांचे उत्कृष्ट बौद्धिक सत्र झाले.
- १५ जून २०१३ रोजी Resource Management in Education आणि Decision making in Education Institutions या विषयावर डॉ. गुरुप्रसाद मूर्ती, डॉ. पी. एन. केळकर, डॉ. माधुरी पेजावर यांचे सर्व प्राध्यापकांना मार्गदर्शन लाभले.
- Role of library in Rising above and beyond Excellence या विषयावर जोशी-बेडेकर महाविद्यालयातील तसेच वेळणेश्वर येथील ग्रंथालय प्रमुखांनी आपले विचार मांडले व दोन्ही महाविद्यालयांतील ग्रंथालयाच्या कार्यप्रणालीचा आढावा घेतला.
- Strategic Management या विषयावर डॉ. गुरुप्रसाद मूर्ती, डॉ. माधुरी पेजावर, डॉ. पी. एम. केळकर यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेसाठी जोशी-बेडेकर आणि बांदोडकर महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुखांची एकत्र गणविभागणी केली होती. एकूण सहा गणांची विभागणी

आवश्यक गोष्टींपासून सुरुवात करा. नंतर आपल्या आटोक्यात येतील अशा गोष्टी करा. शेवटी तुमच्या लक्षात येईल की आपण अशक्य वाटणाऱ्या गोष्टीही करू लागलो आहोत. - सेंट्र फ्रान्सिस ऑफ असिसी

करण्यात आली. दोन्ही महाविद्यालयातील प्रत्येकी तीन याप्रमाणे सहा जणांचे गण विभाजन केले व या सहाही गटांनी २९ जून २०१३ रोजी P.P.T. सत्र आढावा आणि Rising Above and boyond Excellence in VPM's Group of Institutions या विषयाचे विचार कल्पना P.P.T. दूवारे दाखविण्यात आले.

प्रत्येक जणाला विविध विषय देण्यात आले होते–

- गट क्रमांक १ आणि २ ला Models of Excellence for VPM's Thane Science and Commerce College.
- गट क्रमांक ३ आणि ४ ने Creativity and Innovation in VPM's, Thane Science and Commerce College.
- गट क्रमांक ५ आणि ६ ने How to improve productivity at place of work in VPM's, Thane Science and Commerce College.

Plenary Session - How can I improve my effectiveness at place of work at VPM's, Thane Science and Commerce College यावर 'मुक्तसंवाद' सत्र झाले.

कार्यशाळेचा समारोप प्रसिद्ध C.A. श्री. दीपक घैसास यांच्या अतिथीपर भाषणाने झाला. विद्यापकांच्या कार्यप्रणालीवर प्रकाश टाकणाऱ्या भाषणामुळे सर्वच प्राध्यापक वृन्द ज्ञानगंधित झाला.

जोशी–बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या शकुंतला ए. सिंह यांनी कला, परंपरा, संस्कार, संस्कृती इत्यादींच्या समावेशाने शिक्षण क्षेत्रात कला आमूलाग्र बदल होवू शकतो यावर उत्कृष्ट बौद्धिक सादर केले.

दोन दिवसीय या कार्यशाळेला विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकरांच्या मार्गदर्शनाचा सर्व सहभागी प्राध्यापकांना लाभ प्राप्त झाला.

जोशी–बेडेकर वाणिज्य–कला महाविद्यालयातील विना–अनुदानित तत्त्वावर चालविण्यात येणाऱ्या विविध विभागाच्या विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत घेण्यात येणाऱ्या तृतीय वर्षाच्या परीक्षांमध्ये भरघोस यश प्राप्त झाले. विभाग व गुण विभागणी तसेच यशस्वी विद्यार्थ्यांची नावे सदर माहिती खालील प्रमाणे –

**मुंबई विद्यापीठ परीक्षा – मार्च २०१३–१४**

**1) Master in Library and Information Science (M. Lib. I Sc) प्रावीण्य प्राप्त विद्यार्थी**

- विशाखा रावराणे प्रथम श्रेणी
- अलरहेमानवाली मोहम्मद कुरेशी प्रथम श्रेणी
- रुता कोपरकर प्रथम श्रेणी)
- सुमेधा मावलंकर प्रथम श्रेणी) प्रावीण्य
- शीतल गाडे प्रथम श्रेणी)

**२) तृतीय वर्ष वाणिज्य (Account and Finance) (Toppers) प्रावीण्य**

- पटेल शेख निदा आफ्रीन फारुख – प्रथम श्रेणी–८७.८%
- आरती यादव वेदनाथ – प्रथम श्रेणी – ८५.९२%
- अय्यर दिव्यालक्ष्मी गोपाल – प्रथम श्रेणी – ८४.८३%

या विभागाचे एकूण १०८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेत. तसेच महाविद्यालयाच्या १०० टक्के निकाल लागला.

**३) तृतीय वर्ष वाणिज्य (Banking and Insurance Toppers) प्रावीण्य प्राप्त**

- प्रज्ज्वला तोडकर – प्रथम श्रेणी – ७५.३३%
- गायत्री नायक – प्रथम श्रेणी –७४.४२%
- सरीता जाधव – प्रथम श्रेणी – ७२.२५%

या विभागाचे एकूण ३२ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेत. ९३ टक्के निकाल लागला.

---

क्षेत्र कोणतंही असो, हाती घेतलेल्या कामावरील निष्ठा आणि ते सर्वोत्कृष्ट असंच करण्याचा त्याचा ध्यास या दोन गोष्टींवर माणसाच्या जीवनाची कृतार्थता अवलंबून असते. – व्हिंस लोंबार्डी

**४) तृतीय वर्ष (Financial Markets) Toppers प्रावीण्य प्राप्त**

- रेशमा परब – प्रथम श्रेणी – ७७.०८%
- डीम्पल रेड्डी – प्रथम श्रेणी – ७६.७५%
- कृत्तिका खिस्मतराव – प्रथम श्रेणी – ७५.३३%

या विभागाचे एकूण २९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. महाविद्यालयाचा निकाल ९७.७८ टक्के लागला.

**TYBMM (English Medium) Toppers**

- स्वेजल गंगन – प्रावीण्य श्रेणी – ७७.४२%
- विणू आस्ले – प्रावीण्य श्रेणी – ७५.९२%
- नेहा वझरकर – प्रावीण्य श्रेणी – ७५.२५%

या विभागाचे एकूण ३१ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. महाविद्यालयाचा निकाल ९०.३२ टक्के लागला.

**TYBMM (Marathi Medium) Toppers प्रावीण्य प्राप्त विद्यार्थी**

मोहीनी धुमाळ ७६.०८%

रसिका सावंत ७५.७५%

दीपाली राणे ७५.५०%

या विभागाचे एकूण १८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. महाविद्यालयाचा निकाल ९६.७७ टक्के लागला.

**अनुदानित T.Y.B. Com मुंबई विद्यापीठाच्या परीक्षांचा निकाल**

जोशी–बेडेकर महाविद्यालयातील अनुदानित वाणिज्य तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी भरघोस यश संपादित केले आहे. एकूण १११ विद्यार्थी प्रावीण्य श्रेणीत उत्तीर्ण, २५० विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण , १०१ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण, महाविद्यालयाचा ९०.८० टक्के निकाल लागला.

**मार्च–एप्रिल २०१३ तृतीय वर्ष कला–वाणिज्य निकाल जाहीर करण्यात आलेले आहेत.**

| तृतीय वर्ष कला | एकूण गुण | टक्के |
|---|---|---|
| १. आपटे कांचन सुभाष | ४५८ | ७६.३३% |
| २. कु. सिंग चंचल एम. | ४४२ | ७३.६६% |
| ३. कु. शिरसांगी ज्योती एम. | ४३२ | ७२% |

एकूण निकाल : ८३.३३%

| तृतीय वर्ष वाणिज्य | एकूण गुण | टक्के |
|---|---|---|
| १. कु. वाणी अक्षय मोहन | ६२० | ८८.५७% |
| २. कु. जैयस्वाल मनिषा जुगल | ६१८ | ८८.२८% |
| ३. कु. भुवड नितेश अशोक | ६१४ | ८७.७१% |

एकूण निकाल : ९०.८०%

**१२ वी मार्च २०१३ चा निकाल**

| | वाणिज्य | कला |
|---|---|---|
| एकूण बसलेले विद्यार्थी | ६१३ | १७६ |
| गुणवत्ताधारक | १०२ | ०८ |
| प्रथम श्रेणी | २२४ | ३८ |
| द्वितीय श्रेणी | २०० | ७२ |
| पास | ३२ | १८ |
| नापास | ५५ | ४० |
| निकालाची टक्केवारी | ९१.०३% | ७७.२७% |

**बांदोडकर विज्ञान विद्यालय**

**शैक्षणिक वर्ष २०१२–१३ उच्च माध्यमिक शालांत परीक्षा निकाल**

बसलेले एकूण विद्यार्थी : ४६६

(प्रथम+खाजगी+पुनःपरीक्षार्थी):४६६+०५+३३=५०४

प्रथम वर्ग विशेष प्रावीण्य : ६४

प्रथम वर्ग : १७२

समाजात दुही माजवून तुम्ही बंधुभाव निर्माण करू शकणार नाही. कमाईपेक्षा जास्त खर्च कराल तर मग त्यातून उद्‌भवणाऱ्या समस्येपासून तुम्ही दूर राहू शकणार नाही. – अब्राहम लिंकन

द्वितीय वर्ग : १८७
उत्तीर्ण : १०
अनुत्तीर्ण : ३३+३+२१
(प्रथम+खाजगी+पुनःपरीक्षार्थी)
निकाल राखीव : –
एकूण उत्तीर्ण विद्यार्थी : ४३३+२+१२
(प्रथम+खाजगी+पुनःपरीक्षार्थी)
प्रथम बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निकालाची टक्केवारी : ९२.९१%

**गुणवत्ताधारक विद्यार्थी**

| क्र. | विद्यार्थ्याचे नाव | गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | निफाडकर तेजस सुधीर स्वप्ना | ५४९ | ९१.५०% |
| २. | साहू अम्रित रामकृष्णा अर्चना | ५४८ | ९१.३३% |
| ३. | नाबर प्रियाज नितिन नेहा | ५३९ | ८९.८३% |

**विषयात प्रथम**

| क्र | विषय | विद्यार्थ्याचे नाव | १०० पैकी गुण |
|---|---|---|---|
| १ | इंग्रजी | वाकणकर प्राची श्रीकांत भारती | ९१ |
| २ | मराठी | रिसबूड अनिकेत सुधीर मनीषा | ९० |
| ३ | हिंदी | १.दिघे पूनम शंकर मंदाकिनी<br>२. गोळे पूनम शरदचंद्र मंगला | ८८ |
| ४ | संस्कृत | मोरे आदिती निवासराव समिता | ९० |
| ५ | गणित | केसरवाणी रोहीत राकेश गुडीयादेवी | ९९ |
| ६ | पदार्थ विज्ञान | १. रे पर्ल पार्थ सारथी पूर्णिमा<br>२. साहू अम्रित रामकृष्णा अर्चना | ९८ |
| ७ | रसायन शास्त्र | १. रे पर्ल पार्थ सारथी पूर्णिमा<br>२. केंद्रे वैदेही विलास स्नेहल | ९० |
| ८ | जीवशास्त्र | वोबीलीशेट्टी दिप्ती रवी सुधा | ९५ |
| ९ | संगणक | निफाडकर तेजस सुधीर स्वप्ना | १८३/२०० |

**तृतीय वर्ष २०१२–१३ चे वार्षिक निकाल**

एकूण बसलेले : २५४
एकूण उत्तीर्ण : १४६
टक्केवारी : ५७.४८%

**महाविद्यालयात आलेले प्रथम तीन**

| विषय | विद्यार्थ्याचे नाव | गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| Statistics | बेल्हेकर सुमीत अनिल | ७३५ | ९१.८८% |
| Statistics | परांजपे स्वरदा सुनिल | ७२३ | ९०.३८% |
| Statistics | सिंग स्वर्ण रणवीर | ७०९ | ८८.६३% |

**महाविद्यालयात विषयवार प्रथम**

| विषय | विद्यार्थ्याचे नाव | मिळालेले गुण |
|---|---|---|
| रसायन शास्त्र | तोरकडी अश्विनी रामनाथ | ६८० |
| पदार्थ विज्ञान | शेख अमिर असरुद्दीन | ५७२ |
| गणित | सय्यद उम्मे कुलेसुम मोहदनास | ५८३ |
| सांख्यिकी | बेल्हेकर सुमीत अनिल | ७३५ |
| वनस्पतिशास्त्र | शेख हिना अब्दुल्हा | ६०३ |
| प्राणिशास्त्र | सिंग शिल्पा हरीनाम | ५८७ #१० |
| जैव विज्ञान | बेंद्रे अमित नवनित | ६१५ #१० |
| विज्ञान | पाटील सोनल चंद्रकांत | ५८८ |
| | तिडके अंजली गोविंद | ५८३ |

सामान्य माणूस आपल्या शक्तीच्या आणि क्षमतेच्या फक्त एक चतुर्थांशच काम करतो. जी माणसं आपल्या क्षमतेच्या निम्म्याहून अधिक क्षमतेनं कामं करतात त्यांना जग सलाम करतं. – अँड्रयू कार्नेगी

**विषयवार निकाल : माजी विद्यार्थी व्यतिरिक्त**

| विषय वर्ग | रसायन शास्त्र | वनस्पती शास्त्र | प्राणी शास्त्र | जैव विज्ञान | सूक्ष्मजीव शास्त्र | पदार्थ विज्ञान | गणित | सांख्यिकी | संगणक | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रथम | ११ | ७ | ७ | ६ | २ | ३ | ४ | ८ | ९ | ५७ |
| द्वितीय | १९ | ६ | १० | ११ | ११ | १२ | ४ | ६ | १० | ८९ |
| उत्तीर्ण | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| एकूण | ३० | १३ | १७ | १७ | १३ | १५ | ८ | १४ | १९ | १४६ |
| एकूण बसलेले | ६८ | १६ | २१ | २२ | २१ | ३५ | २४ | २३ | २४ | २५४ |
| टक्केवारी | ४४.१७% | ८१% | ८१% | ७७% | ६१.९०% | ४२.८५% | ३३% | ६०.८७% | ७९.१६% | ५७.४८% |
| विद्यापीठ | ६१.३४% | | | | | ४७.३१% | | | ४९.३८% | – |

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या तृतीय वर्ष माहिती तंत्रज्ञान, एम. एस्सी. भाग २, एम. एस्सी आय. टी. भाग १, बी. लिब, एम. लिब व वृत्तपत्र विद्या शाखेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचा निकाल खालीलप्रमाणे आहे.

| विषय | प्रथम वर्ग प्रथम श्रेणी | प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थी | द्वितीय श्रेणी प्राप्त विद्यार्थी | तृतीय श्रेणी प्राप्त विद्यार्थी | टक्केवारी % |
|---|---|---|---|---|---|
| तृतीय वर्ष माहिती तंत्रज्ञान शाखा | – | – | – | – | ६९.०२ |
| एम.एस्सी. भाग२ | १ (पर्यावरण शास्त्र) | १ (रसायन शास्त्र) | ४ (रसायन शास्त्र) | – | ५४.५५ |
| एम.एस्सी.आय.टी. भाग १ | | | | | ७३.६८ |
| ग्रंथालय आणि माहितीशास्त्र पदवी शिक्षणक्रम (B.LIB.) | – | ०९ | १५ | – | ६८.५७ |
| ग्रंथालय आणि माहितीशास्त्र निष्णात शिक्षणक्रम(M.LIB.) | – | ०५ | ०३ | – | ४०.०० |
| वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन पदविका (DCJ) | – | ०७ | ०५ | – | १०० |

एखादा माणूस शूर, हिंमतवान ठरतो तो इतरांपेक्षा अधिक धैर्यवान असतो म्हणून नाही; तर इतरांपेक्षा धैर्य दहावीस मिनिटे जास्त टिकवतो म्हणून. – राल्फ वाल्डो इमर्सन

**प्रत्येक शाखेतील पहिले तीन विद्यार्थी**

| क्रमांक | तृतीय वर्ष माहिती तंत्रज्ञान शाखा | एम.एस्सी. आय.टी. भाग १ | ग्रंथालय आणि माहितीशास्त्र पदवी शिक्षणक्रम (B.LIB.) | ग्रंथालय आणि माहितीशास्त्र निष्णात शिक्षणक्रम (M.LIB.) | वृत्तपत्र विद्या व जनसंज्ञापन पदविका (DCJ) |
|---|---|---|---|---|---|
| प्रथम | शिंदे प्रियांका राजेंद्र १५५०-११३७ | मोहंती मधुस्मिता रविंद्र (A Grade) | कानविंदे अंकिता सुरेंद्र (६४.१%) | काटे वसंत सकू (६९.१३%) | जाधव सुनिल भाऊराव (६२.७५%) |
| | | | | | जाधव पुष्पा सुनिल (६२.७५%) |
| द्वितीय | अबनावे दिपाली गोपाळ १५५०-१११३ | पताले निलम चंद्रकांत (A Grade) | मस्के वैशाली सुहास (६४.००%) | कानावडे मनिषा भिवसेन (६५.७५%) | थिक सचिन विजय (६१.७५%) |
| | | शिवाजी जया सुरेश (A Grade) | | | |
| | | वराडे स्नेहा सुभाष (A Grade) | | | |
| तृतीय | कुलकर्णी अद्वैत विजय १५५०-११११ | - | तांबे अरुणा समिर (६३.८%) | माने प्रियांका बापू (६०.६३%) | हजारे प्रशांत दत्तात्रय (६१.५०%) |

## विद्या प्रसारक मंडळाचे
## ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

**विद्यापीठ परीक्षा निकाल**

| | मुंबई विद्यापीठ | ठाणे विधी महाविद्यालय |
|---|---|---|
| प्रथम वर्ष विधी | २९.१०% | ३२.८९% |
| द्वितीय वर्ष विधी | | ५६.६२% |
| तृतीय वर्ष विधी | ६३.७०% | ७७.८३% |

उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची सरासरी

**महाविद्यालयातील प्रथम तीन क्रमांक**

**१. प्रथम वर्ष विधी**

**प्रथम** : डोंगरे प्रशांत एकूण गुण - ५००
**द्वितीय** : रामचंदानी रेश्मा एकूण गुण - ४८९
**तृतीय** : गणेश गणात्रा एकूण गुण - ४८४

जिंकण्यासाठी खेळा, पराभव टाळण्यासाठी खेळू नका.

**२. द्वितीय वर्ष विधी**

**प्रथम** : सावंत शैला एकूण गुण – ४८५

**द्वितीय** : बावल रुपा एकूण गुण – ४८४

**तृतीय** : मर्चंट नितीन) पेंडसे रेणूका) एकूण गुण – ४८०

**३. तृतीय वर्ष विधी**

**प्रथम** : गोखले जयेश एकूण गुण – ४८९

**द्वितीय** : अकोलकर रुपाली मिराशी प्रिया एकूण गुण – ४८०

**तृतीय** : शहा मनाली एकूण गुण – ४७०

१. ''लेबर लॉ'' या विषयामध्ये प्रथम 'श्री. मा. ना. पाटील पारितोषिक' विजेते : डोंगरे प्रशांत :गुणः७८/१००

२. ''कॉन्स्टीट्युशनल लॉ'' या विषयामध्ये प्रथम 'श्री. बी. एस. बगाडे' पारितोषिक विजेते : योगेश पुराणकर गुण ६६/१००

३. ''पर्यावरण विषयक कायदा या विषयामध्ये प्रथम ''ग्रीन अवॉर्ड विजेते'' : सराफ स्वाती गुण ६९/१००

४. साक्षी-पुरावा विषयक कायदा या विषयामध्ये प्रथम ''श्री. बी.एस. बगाडे'' पारितोषिक विजेते : हनचाटे दिपाली गुण ६९/१००

५. तृतीय वर्ष विधी परीक्षेमध्ये मागासवर्गीयांमध्ये प्रथम : श्रीराम संतोष गुण ४२८

**प्रथम वर्ष विधी प्रवेश प्रक्रिया (२०१३-१४)**

- विद्या प्रसारक मंडळाच्या वेबसाईटवरती प्रवेश अर्ज डाऊनलोड करण्यात आले. अर्ज भरण्यासाठीची शेवटची तारीख मुंबई विद्यापीठाचे पदवीधारक विद्यार्थ्यांचे निकाल घोषित करेपर्यंत केली गेली नाही.
- अनुदानित विधी महाविद्यालयातील प्राचार्यांची सभा न्यू. लॉ कॉलेज माटुंगा येथे २० जून २०१३ रोजी भरविण्यात आली. त्यामध्ये अर्ज स्वीकारण्याची आणि प्रवेश यादी स्वीकारण्याची तारीख निश्चित करण्यात आली.
- विज्ञान शाखेचे अर्ज आणि वाणिज्य शाखेचे अर्ज स्वीकारण्याची तारीख निश्चित करण्यात आली. दि. २८ जून २०१३ रोजी पहिली प्रवेश यादी घोषित करण्यात आली आणि त्यानुसार प्रवेश सुरू आहेत. कला शाखेचे प्रवेश अजून सुरू झाले नाहीत.
- पहिल्या प्रवेश यादीतील कट ऑफ

| | **खुला** | **ओ.बी.सी.** | **एस.सी** | **एस.टी.** |
|---|---|---|---|---|
| वाणिज्य | ८२.४३% | ७५.५७% | ६७.४३% | ४२% |
| विज्ञान | ७०.२४% | ६३.१३% | ५४.२५% | ६२.७९% |

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ साठी प्रवेश समिती निश्चित करण्यात आली.

- विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व शैक्षणिक समूहासाठी "Rising above & beyond Excellence" या विषयावरती चर्चा सत्राचे आयोजन दि. १४, १५ आणि २९ जून रोजी VNBRIMS यांनी केले होते. या चर्चा सत्रामध्ये प्रभारी प्राचार्या श्रीविद्या जयकुमार यांनी सहभाग नोंदविला.

**द्वितीय आणि तृतीय वर्ष प्रवेश प्रक्रिया**

द्वितीय वर्ष विधी प्रवेश मुदत – १४-२३ जून २०१३
तृतीय वर्ष विधी प्रवेश मुदत – २४-२८ जून २०१३

द्वितीय आणि तृतीय वर्षासाठी revaluation अर्जावरती Provisional Admission सुरु आहेत.

२०१३-१४ या शैक्षणिक वर्षासाठीचे सत्र दि. १ जुलै २०१३ रोजी सुरू झाले.

महाविद्यालयाने स्वर्गीय डॉ. वा. ना. बेडेकर यांचा आशीर्वाद घेऊन दि. १ जुलै २०१३ रोजी द्वितीय वर्ष विधी वर्ग सुरू केले.

इतरांच्या चुकांमधून शिका.

## महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर

**प्रथम सत्राचा आढावा :**
**(६ ऑगस्ट २०१२ ते २४ डिसेंबर २०१२)**

कोकणच्या ग्रामीण भागाचा शैक्षणिक विकास होण्यासाठी विद्या प्रसारक मंडळाने महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय वेळणेश्वर येथे चालू शैक्षणिक वर्षात सुरू केले आहे. या महाविद्यालयाची सुरुवात ६ ऑगस्ट २०१२ रोजी झाली. हा उद्घाटन सोहळा या महाविद्यालयाच्या नाना फडणवीस सभागृहात संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या उद्घाटन प्रसंगी डॉ. विजय बेडेकर, कार्याध्यक्ष विद्या प्रसारक मंडळ, ठाणे यांनी या उपक्रमाची माहिती व या उपक्रमाचे उद्दिष्टे सांगीतली. या उपक्रमास संस्थेचे पदाधिकारी, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिनांक ९ ऑगस्ट २०१२ रोजी नाना फडणवीस सभागृहात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश चिंचोलकर व विद्यार्थी यांचे चर्चासत्र संपन्न झाले. तसेच विद्यार्थ्यांना ग्रंथालयाच्या वापराविषयी माहिती देण्यात आली. अभियांत्रिकी महाविद्यालयासाठी मुंबई विद्यापीठातर्फे नव्याने सुरू करण्यात आलेल्या Credit & Grading Evaluation System ची माहिती प्रथम वर्ष विभाग प्रमुख श्री. अमित माने यांनी समजावून सांगितली.

दिनांक १५ ऑगस्ट २०१२ रोजी या महाविद्यालयाच्या प्रांगणात स्वातंत्र्यदिन साजरा झाला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश चिंचोलकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी शिक्षक, विद्यार्थी, कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

दिनांक २१ ऑगस्ट २०१२ रोजी डॉ. विजय बेडेकर, कार्याध्यक्ष विद्या प्रसारक मंडळ यांचे "Education in India Prior to British Rule" या विषयावर विद्यार्थी, कर्मचारी, पंचक्रोशीतील विविध क्षेत्रांतील पदाधिकारी, वेळणेश्वरचे ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ यांच्यासाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी प्रत्येक शनिवारी व्यक्तिमत्त्व विकास अंतर्गत विविध उपक्रम राबवले जातात. महाविद्यालयाचे संचालक डॉ. कमलाकर देसाई यांनी "Know your Brain and Heal your Brain" या विषयावर व्याख्यान देऊन मार्गदर्शन केले. त्याच दिवशी दुसऱ्या सत्रात त्यांनी "Effective Communication" या विषयावर व्याख्यान देऊन संप्रेषणाचे महत्व, संप्रेषण करताना घ्यावयाची काळजी याविषयी माहिती दिली. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून विविध दर्जेदार चित्रपट दाखविण्यात येतात. या चित्रपटांद्वारे मनोरंजन, शिक्षण, इंग्रजी भाषेबद्दलचे ज्ञान हे उद्देश साध्य केले जातात.

अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती व सृजनशीलता वाढावी यासाठी १०-१० विद्यार्थ्यांचे Project Group तयार करण्यात आले आहेत. या ग्रुपमध्ये प्रत्येक शाखेच्या विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतले आहे. प्रत्येक गटासाठी एक प्राध्यापक मार्गदर्शक म्हणून नेमण्यात आला आहे.या अंतर्गत दिनांक ७ सप्टेंबर २०१२ रोजी "Concurrent Engineering approach in project Building" या विषयावर महाविद्यालयाचे संचालक डॉ. कमलाकर देसाई यांनी विद्यार्थ्यांना विविध प्रकल्प दाखवून मार्गदर्शन केले.

दिनांक १५ सप्टेंबर २०१२ रोजी डॉ. विश्वेश्वरय्या यांच्या जयंती निमित्त महाविद्यालयात Engineer's Day साजरा करण्यात आला. या दिवशी विद्यार्थ्यांनी गट करून आपापल्या विभागावर आधारित Power Point

Presentation सादर केले. नंतर प्राचार्य डॉ. अविनाश चिंचोलकर व डॉ. देसाई यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दिनांक १२ ऑक्टोबर २०१२ रोजी प्रा. श्री. गणेश दिवे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदूषण या विषयावर Poster Competition चे आयोजन करण्यात आले. या विषयावर सर्व विद्यार्थ्यांनी विविध Posters तयार केली व भोपाळ वायू गळती दुर्घटना या Poster ला प्रथम क्रमांक मिळाला.

कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात २१२ व रत्नागिरी जिल्ह्यात ४११ प्राथमिक व माध्यमिक शाळा आहेत. या शाळांपैकी अंदाजे ९०% शाळांमध्ये मराठी माध्यमातून शिक्षण देण्यात येते. या शाळांतील जवळजवळ ९५% शिक्षकांना संगणकाचा वापर योग्य प्रकारे करता येत नसल्यामुळे ते अध्यापन व शालेयव्यवस्थापनात आमुलाग्र बदल घडवून आणू शकत नाही. कोकणातील शिक्षणाची ही परिस्थिती बदलण्यासाठी संगणक प्रशिक्षणाची नितांत आवश्यकता आहे. यासाठी सामाजिक बांधीलकी म्हणून विद्याप्रसारक मंडळ, ठाणे संचालित महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाने शालेय शिक्षकांसाठी मराठीतून संगणकाचा अध्यापन, व्यवस्थापन व सुसंवाद-संपर्कासाठी उपयोग ही कार्यशाळा दिनांक १३ व १४ सप्टेंबर तसेच दिनांक १ व २ डिसेंबर २०१२ रोजी यशस्वी रित्या आयोजित केली. पहिल्या कार्यशाळेसाठी २२ तर दुसऱ्या कार्यशाळेसाठी ७० शिक्षक प्रशिक्षणार्थी सहभागी झाले.

अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रथम वर्षाची पहिली Internal Assessment - १८ सप्टेंबर २०१२ ते २५ सप्टेंबर २०१२ या दरम्यान घेण्यात आली. दुसरी Internal Assessment ही २ नोव्हेंबर ते ७ नोव्हेंबर या कालावधीत घेण्यात आली. दिनांक १९ नोव्हेंबर ते २१ नोव्हेंबर विद्यार्थ्यांच्या तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षा झाल्या. २५ व २६ नोव्हेंबर २०१२ रोजी BEE या विषयासाठी श्री. प्रमोद वायकर, व्याख्याते RMCET, देवरुख यांनी सराव शिबीर घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.तसेच मुंबई विद्यापीठाची प्रथम सत्र परिक्षा दिनांक ४ डिसेंबर २०१२ ते २४ डिसेंबर २०१२ या दरम्यान झाली.

दिनांक ६ ऑक्टोबर २०१२ रोजी पालक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा अहवाल पालकांना सादर करण्यात आला.

कनिष्ठ महाविद्यालय, पाटपन्हाळे व श्री देव गोपालकृष्ण कनिष्ठ महाविद्यालय, गुहागर येथील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयास भेट देऊन अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सेवा-सुविधा व विविध उपक्रमांची पाहणी केली.

प्रथम सत्रात या महाविद्यालयास अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या. त्यात डॉ. मधुकर आंबेकर आणि डॉ. विदुला आंबेकर, लंडन यु.के. यांनी महाविद्यालयातील सर्व विभागांचे चित्रीकरण करून त्यांनी महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. तसेच वसतिगृहास भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. श्री. गाडगीळ, श्री. एस. जी. ब्रम्हे आणि कुटुंब, श्री. व सौ. प्रियदर्शन दीक्षित, प्रा. आर. पी. खान, श्री. जोसेफ (अध्यक्ष श्री. माउली मंडळ), श्री. मोरे (सचिव एस. एम. एम. ठाणे), श्री. रवी आंग्रे (विश्वस्त एस. एम. एम. ठाणे), श्री. भगवान शिंदे (विश्वस्त एस. एम. एम. ठाणे), श्री. काणे बंधू, श्री. सी. व्ही. काणे, श्री. प्रदीप शिर्के, श्री. श्रीराम काणे, श्री. संजय झेंबे इ. मान्यवरांनी महाविद्यालय परिसरास भेटी दिल्या. तसेच श्री. विजय महाजन, माजी अध्यक्ष, CITI बँक यु.एस.ए. यांनी विद्यार्थ्यांशी अर्थव्यवस्था या विषयावर व्याख्यान देऊन मार्गदर्शन केले.

**द्वितीय सत्राचा आढावा**
**(७ जानेवारी २०१३ ते ७ जून २०१३)**

१७ जानेवारी २०१३ ते १९ जानेवारी २०१३ या

दरम्यान कोकणामधील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांसाठी ''संगणकाधारित शिक्षक प्रशिक्षण'' या कार्यशाळेचे आयोजन केले. भारतीय औद्योगिक संस्था, पवई (आयआयटी) आणि सी. डी. ए. सी. यांनी विकसित केलेल्या आकाश -२ या छोट्याशा संगणकाचे रत्नागिरी, सिंधुदुर्ग सारख्या ग्रामीण जिल्ह्यातील शिक्षकांना महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे तीन दिवसीयकार्यशाळेद्वारे प्रशिक्षण देण्यात आले. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात नव्याने जन्माला आलेल्या आकाश-२ टॅबमुळे अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत आमूलाग्र बदल होणार आहे. यासाठी आयआयटी , पवई येथील माधुरी सावंत यांनी मार्गदर्शन केले. याच वेळेस संगणकाचे काहीच ज्ञान नसलेल्या शिक्षकांसाठी प्राथमिक स्वरूपाचा ३ दिवसाचा कोर्स घेण्यात आला. त्यात वेगवेगळे डाटाबेस, मायक्रोसॉफ्ट वर्ड, मायक्रोसॉफ्ट एक्सेल आणि पावर पॉइन्ट तसेच कॉम्पुटर हार्डवेअर, यांचे प्रशिक्षण देण्यात आले.

उद्योजक दीपक घैसास यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. या उपक्रमाकरिता महाराष्ट्र टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचे माजी संचालक कै. मुरलीधर चैनी यांच्या स्मरणार्थ सुयश चैनी यांनी २५ लघु संगणक महाविध्यालायास देणगी दाखल दिले. आकाश-२ चे नवीन संगणक शाळांमध्ये जून २०१३ पासून विद्यार्थ्यांसाठी प्रायोगिक तत्वावर उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय वेळणेश्वर व आयडीयल शैक्षणिक संस्था (IET),मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने १२ वी उत्तीर्ण झालेल्या विध्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबीर व प्रथम वर्षातील अभियांत्रिकी शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी अभियांत्रिकी क्षेत्रातील करियर मार्गदर्शन देण्यात आले. या प्रसंगी Ideal Education Trust चे अनुभवी प्राध्यापक श्री. प्रकाश मोनाली, प्रा. श्री. विजय जोशी, प्रा. श्री. नंदकिशोर परब यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच पुढे महिनाभर ३४ विद्यार्थ्यांना महाविद्यालयांत व्हिडियो कॉन्फरंस द्वारे MH-CET चा क्रॅश कोर्स घेण्यात आला .यावेळी महाविद्यालयात कार्यरत असलेल्या शिक्षकांनी मोलाचे सहकार्य करून हा उपक्रम यशस्वीरित्या राबविला.

२ फेब्रुवारी २०१३ रोजी पहिल्या सृजन स्पर्धेचे विद्या प्रसारक मंडळाच्या महर्षी परशुराम महाविद्यालयात आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा ११ वी आणि १२ वी मधील विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी होती. ह्या स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे गुहागर तालुक्यातील औद्यगिक क्षेत्रातील प्रसिद्ध उद्योजक श्री. प्रसाद वैद्य यांच्या हस्ते करण्यात आले. ही स्पर्धा Scientific Model Making, Poster Presentation आणि Essay Writing अशा एकूण तीन प्रकारांमध्ये घेतली. Scientific Model Making मध्ये एकूण सहा संघांनी, Poster Presentation मध्ये ५ संघांनी भाग घेतला होता तर Essay Writing साठी ५ जणांनी भाग घेतला होता. एकूण स्पर्धेमध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील ५ कनिष्ठ महाविद्यालयातील २३ विद्यार्थी सहभागी झाले होते.

दिनांक ८ फेब्रुवारी २०१३ ला जिल्हा परिषद शाळा, साखरी आगार या शाळेने भेट दिली. मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा म्हणून महाविद्यालयातील सोलर इलेक्ट्रिसिटी प्लांट, दाखविण्यात आला.

दिनांक १३ फेब्रुवारी २०१३ ला महाविद्यालयाच्या परिसरात चार इमारतींचे उद्घाटन करण्यात आले. त्यात द्वितीयवर्षासाठी आवश्यक असलेली B१ ही शेक्षणिक इमारत आहे विद्यार्थ्यांना आवश्यक शेक्षणिक व इतर साहित्य मिळण्यासाठी स्टोअर, हेअर कटिंग, लॉन्ड्री दवाखाना व बँक A ची सोयअसलेली ''विविधा'' (Utility) या इमारतीचे देखील उद्घाटन झाले. तसेच

गेस्ट हाउस व जिमखाना इमारतींचे उद्‌घाटन याच दिवशी झाले. या उद्‌घाटन सोहळ्यात डॉ. विजय बेडेकरांनी या उपक्रमात कार्यरत असलेल्या विविध स्तर व एजन्सी या बाबत माहिती सांगितली व त्या एजन्सीच्या प्रमुखांचे केलेल्या कामाबद्दल आभार मानले. या कार्यक्रमास विद्या प्रसारक मंडळ, ठाणे या संस्थेचे पदाधिकारी, या संस्थे अंतर्गत असलेल्या महाविद्यालयांचे प्राध्यापक वर्ग, ग्रंथपाल व इतर मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमास कोकण परिसरातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. यात दापोलीचे माजी आमदार डॉ. चंद्रकांत मोकल हे ही उपस्थित होते.

१६ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी २०१३ दरम्यान द्वितीय सत्रातील पहिली अंतर्गत मूल्यांकन (Internal Assessment ) परीक्षा घेण्यात आली. २१ फेब्रुवारी २०१३ रोजी डॉ. गाडगीळ यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले.

दिनांक २२ फेब्रुवारी २०१३ रोजी करिअर डेव्हलपमेंट अँड कार्पोरेट प्लेसमेंट या विषयावर श्री. जयवंत वैद्य, सेवा निवृत्त जनरल मॅनेजर L&T मुंबई व श्री. अजय कौशल डायरेक्टर बिग बॉक्स कौन्सिलिंग अँड ट्रेनिंग, मुंबई यांचे व्याख्यान झाले. 'अभियांत्रिकी क्षेत्रातील नव्या संधी' याबाबत शिक्षकांना/प्राध्यापकांना चांगल्या प्रकारे मार्गदर्शन मिळाले. २४ फेब्रुवारी २०१३ रोजी वर्षातील दुसरी पालकसभा घेण्यात आली.या पालकसभेमध्ये विद्यार्थ्यांच्या अंतर्गत मूल्यमापन चाचणी क्र.१ चे गुण सादर करण्यात आले. तसेच पालकांच्या व पाल्याच्या समस्यांवर चर्चा करून समस्या सोडविण्याचा प्रयत्न करण्यात आला. याच दरम्यान महाविद्यालयात विविध क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. बौद्धिक स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांचे गट करून Quiz Competition घेण्यात आली. दि.१३ फेब्रुवारी २०१३ रोजी या महाविद्यालयाचे पहिले वार्षिक स्नेहसम्मेलन पार पडले. यामध्ये नृत्य, विनोद, गायन, कविता वाचन असे विविध कार्यक्रम झाले. या कार्यक्रमात प्राचार्यांनी गायनात सहभाग घेऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी या सर्वानीच यात सहभाग घेतला होता.कार्यक्रमाच्या उत्तरार्धात विविध स्पर्धेत भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

प्राचार्य डॉ. अविनाश चिंचोळकर व प्रथम वर्ष समन्वयक प्रा. श्री. अमित माने यांच्या मार्गदर्शनांतर्गत Journal Club तयार करण्यात आला. या क्लब मध्ये ५ विद्यार्थ्यांचा एक ग्रुप असे सर्व विद्यार्थ्यांचे ग्रुप करण्यात आले. व प्रत्येक ग्रुप साठी विविध विषय देण्यात आले. या विषयांवर विद्यार्थ्यांनी व्याख्यान तयार करायचे. व्याख्यानासाठी विद्यार्थ्यांनी विविध संदर्भ ग्रंथाचा वापर केला पाहिजे. तसेच Journal मध्ये प्रकाशित होणाऱ्या लेखांचा वापर केला पाहिजे. असे बंधन घालण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी ASTM Digital Library, IEEE व J-Gate सारखे डाटाबेस वापरावेत हा उद्देश होता. तसेच संदर्भ ग्रंथांचा वापर जास्तीत जास्त करावा हाही उद्देश होता.

द्वितीयसत्रातील अंतर्गत मूल्यांकन चाचणी क्र.२ (Internal Assessment) घेण्यात आली. व द्वितीय सत्राची विद्यापीठ परीक्षा दि. १० मे २०१३ ते ७ जून २०१३ या दरम्यान झाली.

अशा प्रकारे, महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाने वर्षभरात विविध प्रकारचे उपक्रम राबविले तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकास बरोबर व्यक्तिमत्व विकासाचा प्रयत्न केला. कोकण भागाचा शैक्षणिक विकास करण्यासाठी देखील संस्था व महाविद्यालय यथायोग्य प्रयत्न करीत आहे.

●●●

# जाहीर आवाहन

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**कोकण परिसराची निवड :**

एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे, उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर याविषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण केली पाहिजे असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वांत कमी आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईल; पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

**विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पविषयी:**

**कोकणातील गुहागर जवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे.** त्या गावची लोकसंख्या जवळपास ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणार सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावाच्या बाजूने जाणार आहे.

या वास्तू समूहामध्ये ६ शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख व प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र वास्तू

हिणकस माणूस सत्य बोलायला तत्पर असलेल्या व्यक्तीच्या सावलीलादेखील उभा राहत नाही. – विल्यम ब्लेक

आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेला प्रकल्पाचा पूर्ण **खर्च १५० कोटी रुपये पर्यंत अपेक्षित आहे**. त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागांतून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील, कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्र आणि सादिलवार कामे करणारे असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय, प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींनासुद्धा वाव मिळेल.

प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार केला आहे. त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरुवातीला ३०० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्यात येणार आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

**देणगीसाठी व मुदत ठेवीसाठी आवाहनः**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणारी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु. १० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

१) संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रु. ५०००/- त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२) सदर ठेवीचा कालावधी ५/७ व १० वर्षाचा असेल. किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३) ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४) ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५) सदर ठेवीवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.

६) काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास, ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

या प्रकल्पावरती पुढील १० वर्षात सुमारे १५० कोटी रुपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल, जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. **या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.**

आपला विश्वासू,
**डॉ. विजय बेडेकर**
कार्याध्यक्ष
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

●●●

आयुष्यातल्या असंख्य समस्यांची फक्त दोनच कारणं असतात. एक तर आपण विचार न करता कृती करतो किंवा कृती करण्याऐवजी विचार करतो.

# गीतासंदेश



- कशाला व्यर्थ चिंता करीत आहेस? कुणाला घाबरतो आहे? तुला कुणीही मारु शकत नाही. आत्मा अमर आहे.
- जे झाले आहे, जे होत आहे आणि जे होणार आहे ते सारे ईश्वरेच्छेने होत असल्याने ठीक आहे. गतकाळाचा पश्चाताप नको, भविष्याची चिंता नको. वर्तमानातच जग!
- तुझे काय गमावले म्हणून तू शोक करीत आहेस? तू काय घेऊन आला होतास? तू स्वतःचे असे काय निर्माण केलेस? जे मिळविलेस ते परमेश्वराकडूनच मिळविलेस. जे गमावलेस ते या भगवद्‌भूमीमधीलच होते. तू रिकाम्या हाताने आला आहेस व रिक्तहस्ते जात आहेस! तुझे असे काही नव्हते आणि असणारही नाही. तेव्हा या नश्वर गोष्टींना माझे समजून वृथा शोक करु नकोस!
- माया परिवर्तनशील आहे. संसार क्षणभंगुर आहे. एका क्षणात दरिद्री कोट्याधीश होतो. करोडपती भिक्षाधीश होतो. मृत्युही जीवन आहे. जीवनात मृत्यु आहे. लहान थोर, आप-पर सारे भेद मनातून नष्ट कर. सारे तुझे आहे. तू सर्वांचा आहेस!
- तू शरीर नाहीस, शरीर तुझे नाही. तू शरीराचा नाहीस. शरीर हा पंचभूतांचा मिलाफ आहे. त्यातील आत्मा आच शाश्वात आहे!
- स्वतःचे सर्वस्वसमर्पण भगवंताचे ठायी तू कर. तोच एक आश्रयस्थान, शरण्यधाम आहे. त्याला जाणून तू भय, शंका, शोक दुःखातून मुक्त हो. प्रत्येक कर्माची 'हरि ॐ तत् सत् ब्रह्मार्पणमस्तु' या भावनेने भगवंताचे चरणी आहुती दे. हा कर्मयोगाचा महान यज्ञ आहे यातच जीवन मुक्तीचे सार आहे. गोविंद परमानंद, शामसुंदर, नंदकुमार! तू एक महासागर आहे. मी एक बिंदू आहे. तू मला आपल्या अंतरात समावून घे.

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❋ संपर्क ❋

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.